

# माणूस

एप्रिल

१९६२

५० न. पै.

# माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
**श्री. ग. माजगांवकर**

● ● ●

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
संपादक, व्यवस्थापक
'**माणूस**', मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

★ ★ ★

**वार्षिक वर्गणी : पांच रुपये**
**किरकोळ अंक : पन्नास नये पैसे**

● ● ●


**— सूचना —**

१ ) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

२ ) पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

३ ) या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें 'माणूस' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं

अभिराष्ट्रेण वर्धताम्





**वर्ष पहिलें ] एप्रिल, १९६२ [ अंक अकरावा**


## स्वरूपदर्शन


**सामाजिक अंतरंग**

एका प्रतिष्ठेच्या निवडणुकीचा शोध — श्री. ग. माजगांवकर

**साहित्य व कथा**

मला दिसलेले लेखक : — प्र. के. अत्रे –'मी'
स्वर्ग आणि नरक : — सदानंद चेंदवणकर
रक्ताचें नातें : — शरद चौधरी

**प्रवास वर्णन**


श्रीगर : एक सौंदर्य यात्रा : — सौ. कमला पेंडसे
तिरुचिरापल्ली : एक भ्रमण चित्र : — प्रा. चंद्रकांत वर्तक

**रंगभूमी-क्रिडा**

ससा आणि कासव : — प्रा. ग. प्र. प्रधान
नाट्यरत्न नानासाहेब चापेकर : — प्रतिनिधी—
रामनाथन् कृष्णन् व रॉय इमर्सन — विद्याधर

बुद्धिबळाच्या पटावर, आपलें एंजिन इ.

मुखपृष्ठ — मा. द. शिंदे, पुणें



# एका प्रतिष्ठेच्या निवडणुकीचा शोध...

श्री. ग. माजगावकर, एम्. ए.

पुण्यांतील शिवाजीनगर मतदारसंघांतील यंदाच्या निवडणुकील महाराष्ट्राच्या दृष्टीने एक महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें होतें प्रामुख्याने बुद्धिजीवी पांढरपेशा वर्गाचा हा मतदारसंघ गेलीं तीस. चाळीस वर्षे बहुजनसमाजापासून अनेक कारणांमुळे दूर गेलेला होता- काँग्रेसच्या राजकारणालाहि येथील समाजाने आजवर विरोधच केला· पण संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्येंहि कां· महत्त्वाचीं स्थित्यंतरें झालीं. ताज्या दमाचें, नव्या विचारांचें वही सर्वसंग्राहक असें नेतृत्व काँग्रेसला लाभलें. अशा नेतृत्वाने काँग्रेस-पासून आजवरदूर गेलेला सुशिक्षितवर्ग आपल्याजवळ आणण्याचा प्रयत्न करणें स्वाभाविकच होतें. हा प्रयत्न यशस्वी होतो की नाही, पांढरपेशा समाज काँग्रेसच्या नव्या नेतृत्वाला साथ देण्यास तयार आहे की नाही, हें पडताळून पाहण्यासाठी काँग्रेसने ही जागा प्रतिष्ठेची मानली. त्याचप्रमाणे विरोधी हिंदुत्वनिष्ठांच्या दृष्टिनेंहि ही जागा महत्त्वाची होती. कारण हा भाग म्हणजे हिंदुत्वनिष्ठ पक्षाचा व त्याच्या विचारसरणीचा बालेकिल्लाच होता. दोन्ही पक्षांनी आपले मातबर उमेदवारहि लढतीसाठी उभे केले होते. या सर्व कारणांमुळे शिवाजीनगर मतदारसंघ यंदाच्या निवडणुकींत विशेष गाजणें अगदीं स्वाभाविकच हो.तें

प्रतिष्ठेची ही जागा काँग्रेसने प्रचंड बहुमतान जिंकली हें खरें आहे. पण या विजयावरून काँग्रेसला अपेक्षित असणारा सुशिक्षित वर्गाच्या अनुकूलतेचा पडताळा मिळाला का, हें मात्र ठरविणें तितकेंसें सोपें नाही. यशाचा फार मोठा वाटा श्री. बर्वे यांच्या वैयक्तिक पुण्याईचा आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. या मतदारसंघांतील अनेक प्रतिष्ठित व्यक्ति व अपक्ष कार्यकर्ते श्री. बर्वे यांच्यासाठी केवळ वैयक्तिक भूमिकेवरून प्रयत्न करीत होते. श्री. बर्वे निवडून आल्यावर मंत्रिपद भूषविणार आहेत ही अनेकांच्या दृष्टीने एक आकर्षक बाब होती, हें सत्यहि नाकारण्यांत अर्थ नाही. परिस्थितीची ही अनुकूलता पाठिशी नसती तर केवळ ' काँग्रेसच्या प्रतिष्ठेवर ' बर्वे यांना हा विजय मिळाला असता की नाही याची शंकाच वाटते. कारण बहुजन-समाजाच्या व श्रमजीवी जनतेच्या सुखदुःखाशी समरस होण्यानेच वतःच्या चालू जीवनाची कोंडी फुटणार आहे हें येथील सुशिक्षित बुद्धिजीवी वर्गाला जरी मनोमन पटलें असलें तरी त्यासाठी 'काँग्रेस-प्रवेश' हा एकच दरवाजा मोकळा आहे हें मान्य करावयास मात्र हा वर्ग अद्याप तयार नाही. श्री. बर्वे यांच्या वैयक्तिक प्रभावामुळे फार मोठा सुशिक्षित वर्ग काँग्रेसला 'एक मत' टाकण्यास तयार झाला ही वस्तुस्थिति डोळ्याआड करून चालणार नाही.

## विस्मयजनक स्थित्यंतरें

परंतु बर्वे यांची वैयक्तिक लोकप्रियता व काँग्रेससंघटनेची ताकद या दोन्ही गोष्टी जमेला धरूनहि बर्वे यांच्या विस्मयजनक यशाचें कोडें पूर्णपणें सुटत नाही. बर्वे यांच्या निकटवर्तीयांनाहि एवढें प्रचंड लोकमत आपल्या पाठीशी उभे राहील याची शेवटपर्यंत कल्पना नसावी·

बर्वे यांनी निवडणूकीला दोन दिवस बाकी असतां सदाशिव पेठेंतून जी पुन्हा एकदा अचानक प्रचारफेरी काढली त्यावरून त्यांनाहि यशाच्या अवघडपणाची योग्य ती कल्पना असावी असें वाटतें. मग ही अवघड परिस्थिति एकाएकी अनुकूल कशी झाली ? अनेक जाणत्या निरीक्षकांचें असें म्हणणें आहे की या निवडणुकीची सारी ' हवा ' च शेवटच्या दोन दिवसांत विलक्षण वेगाने फिरली. विरोधी पक्षीय कार्यकर्त्यांशी यासंबंधी चर्चा करीत असतां एक अनुभव सर्वांच्या बाबतींत समान असलेला आढळून आला. हवालदील शब्दांत एकाने सांगितले–' दोन दोन महिने ज्या लोकांनी आमच्यासाठी कामें केलीं, आमचीं पत्रकें वाटलीं, सभा संघटित केल्या, तीं माणसें शेवटच्या दोन दिवसांत एकदम फिरलेलीं पाहून आम्ही थक्कच झालों. कांही तोंडच दाखवायला तयार झालीं नाहींत, तर कांही उघडपणें कॉंग्रेस उमेदवारांचा प्रचार करीत होतीं. आम्ही आजवर अनेक निवडणुका पाहिल्या. पण हा अजब प्रकार यापूर्वी कधीच अनुभवास आला नाही.'

अनेकांच्या तोंडून जेव्हा कमीजास्त प्रमाणांत असाच अनुभव ऐकायला मिळतो तेव्हा या ' चमत्कारा ' वर संपूर्ण अविश्वास दाखविणें सत्यान्वेषणाच्या दृष्टीनेहि चुकीचेंच आहे. बर्वे यांच्या उमेदवारीमुळे लोकमत कॉंग्रेसला अनुकूल झालें होतें हें मान्य करणें वेगळे आणि लोकमताचा पारा एवढ्या वेगाने खालीवर जातो अशी समजूत करून घेणें वेगळें. जनसंघानें निवडणुकीपूर्वी जी २–२।। मैल लांबीची मिरवणूक काढली त्यामुळे कॉंग्रेसचे मतदार ' जागे ' झाले, 'सकाळ'-मधून श्री. शंकरराव मोरे यांच्याविरुद्ध जो जातिद्वेष पसरवणारा प्रचार झाला त्यामुळे कॉंग्रेसमागे असणारा ब्राह्मणेतर समाज बर्वे-मोरे यांना निवडून देण्याच्या जिद्दीने शेवटच्या दोन-तीन दिवस कामाला लागला, अशीं कांहीं कारणे या ' चमत्कारा ' च्या उलगड्याप्रीत्यर्थ सांगण्यांत आलीं. तीं कांही प्रमाणांत खरींहि असतील. तरीपण निवडणुकीच्या आदल्या रात्रीं जे फोडाफोडीचे व फिरवाफिरवीचे प्रकार घडल्याची विरोधकांची तक्रार आहे तिकडेहि लोकमताच्या अभ्यासकांनीं जरूर लक्ष पुरविलें पाहिजे. लोकशाहीचीं बीजें या देशांत रुजलीं असा विश्वास बाळगणाऱ्यांनी विचार करावा एवढें हें लोकमताचें स्थित्यंतर अनपेक्षित व विस्मयजनक आहे एवढें खरें !

## कॉंग्रेस व सुशिक्षित समाज

| श्री. बर्वे | श्री. म्हाळगी | श्री. नलावडे | श्री. लिमये |
|---|---|---|---|
| १८,००० | १५००० | ९००० | ६००० |

सुमारे ४५ ते ५० हजार मतदान व्हावें या हिशोबाने वरीलप्रमाणे निरनिराळ्या पक्षांतर्फे अंदाज बांधण्यांत आले होते. श्री. बर्वे निवडणुकींत विजयी होणार अशी बहुतेकांची अटकळ होतीच; परंतु आपल्या नजीकच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षां ३।४ हजार मतें बर्वे यांना अधिक पडतील अशी सर्वसाधारण कल्पना होती. परंतु प्रत्यक्षांत घडलें तें मात्र असें:–

| श्री. बर्वे | श्री. म्हाळगी | श्री. नलावडे | श्री. लिमये |
|---|---|---|---|
| ३०,३०६ | १४,७२३ | ३९९३ | १५०९ |

यावरून श्री. नलावडे व लिमये याची बहुसंख्य मतें बर्वे यांना मिळाल्यामुळेच ते म्हाळगी यांच्यापुढे १५ हजार मतांनी जाऊं शकले हें स्पष्ट होतें. श्री. नलावडे व लिमये यांच्या प्रचाराचा जोर ब्राह्मणेतर मतदारवर्गांत विशेष होता. शिवाजीनगर मतदारसंघ प्रामुख्याने सुशिक्षित पांढरपेशांचा समजला जात असला तरी एकूण सत्तर हजार मतदारांपैकी तीस-पस्तीस हजार मतें यांत बिगरपांढरपेक्षा समाजाचीहि आहेत. केवळ पांढरपेशांच्या मतांचा प्रश्न असता तर बर्वे-म्हाळगी या जोडींत एवढी तफावत पडली नसती. परंतु पांढरपेशा वर्गांतील मतांच्या जोडीलाच बिगरपांढरपेशा समाजांतील बहुसंख्य मतें बर्वे यांच्या पेटींत पडल्यामुळेच बर्वे व म्हाळगी या दोघांत १५ हजार मतांची प्रचंड दरी तयार झाली. बिगरपांढरपेशा समाजाचा हा एकमुखी पाठिंबा व बर्वे यांच्या वैयक्तिक पुण्याईवर मिळालेली सहस्त्रावधी मतें ही वेरीज ध्यानांत घेतली तर सुशिक्षितांचा पाठिंबा मिळविण्यासाठी कॉंग्रेस संघटनेला अद्याप बरेच परिश्रम घ्यावे लागतील हें यावरून स्पष्ट होतें.

## राजकीय यशाची मजबुती

या संमिश्र स्वरूपाच्या मतदारवर्गामुळेच एक आदर्श लोकप्रतिनिधी या नात्याने श्री. बर्वे यांच्यापुढील जबाबदाऱ्या आता वाढल्या आहेत दोन भिन्न सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक स्तरांत वावरणाऱ्या लोकांचे गट बर्वे यांच्या पाठीशी निवडणूककालांत उभे होते. वर सांगितल्याप्रमाणे गरीब, अर्धशिक्षित असा सर्व ब्राह्मणेतर समाज, त्याहीपेक्षा कनिष्ठ पातळीवर जीवन जगणारा रोजमजूर वर्ग एका टोकाला, तर विश्वविद्यालयीन वातावरणात रमणारा, संगीतनृत्य-नाटकादि कलाविलासांत रमणारा, संपन्न व सुधारक असा डेक्कन जिमखाना व इतर भागांतील उच्चकुलीन पांढरपेक्षा वर्ग दुसऱ्या टोकाला, असा बर्वे यांचा अनेकजिनसी मतदारवर्ग आहे. ' शिवाजीनगर मतदारसंघ ' हा महाराष्ट्रांतील एक आदर्श मतदारसंघ व्हावा ही आपली मनीषा बर्वे यांनी अनेक प्रसंगीं बोलून दाखविली आहे. यासाठी भिन्नभिन्न गटांना राजी राखण्यासाठी आर्थिक मदतीचे वेडेवाकडे प्रवाह आपल्या मतदारवर्गांत सोडून देण्याचा आजवरचा सर्व ठिकाणचा पायंडा बदलून येथे मतदारा–मतदारांमधील वर दाखविलेलें दोन ध्रुवांचें अंतर कमी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होणें अवश्य आहे. हें कार्य कुशल संघटकांचें आहे; निःस्वार्थी समाजसेवकांचें आहे. मध्यमवर्गीय जीवनाची कोंडी राजकीय पातळीवरून फोडण्याचा यशस्वी प्रयत्न बर्वे यांनी करून दाखविला; या यशस्वी राजकीय प्रयत्नाचा सामाजिक व सांस्कृतिक मागोवा पद्धतशीरपणें घेतला गेला नाही तर हा राजकीय विजय अपूर्ण राहील, अल्पकालीन राहील अशी भीति वाटते.

## आजचा कनिष्ठ मध्यमवर्ग

याउलट म्हाळगी यांचा मतदारवर्ग एकजिनसी वस्त्रासारखा अखंड असला तरी या वस्त्राचा रंग आज विटल्यासारखा झाला आहे. म्हाळगी यांना केवळ पक्षाच्या स्वयंसेवकांचीं व त्यांच्या कुटूंबियांचीं मतें मिळालीं हा समज बरोबर नाही. अनेक संघीय वृत्तीच्या लोकांनी बर्वे यांना मतदान केलेलें आहे व ज्यांचा संघ-जनसंघाशी संबंध नव्हता अशाहि कित्येकांनी म्हाळगींचे व्यक्तिगत गुण पाहून त्यांना मतें दिलेलीं आहेत. म्हाळगी यांच्या मतदारवर्गाचा एकजिनसीपणा त्याच्या कनिष्ठ मध्यमवर्गीय स्वरूपावर अवलंबून आहे. परिस्थितीच्या

दुष्टचक्रांत सापडलेल्या या गरीब पांढरपेशा समाजाजवळ परंपरेनें चालत आलेलीं कांहीं सांस्कृतिक व बौद्धिक मूल्यें असलीं तरी, नव्या काळाशी या मूल्यांचें निश्चित नातें कोणतें, जुन्यापैकी शाश्वताचा भाग कोणता व केवळ संवयीने अंगीं जडलेल्या पौराणिक चालीरीती कोणत्या याचा निश्चित निर्णय घेऊन, त्यानुसार आपल्या वैयक्तिक व सामाजिक आचारविचारांत सुधारणा करण्याचा या वर्गानें अद्याप मनापासून प्रयत्न केलेला नाही. परिस्थितीच ज्याचा त्याग करायला लावते तेवढ्या जुन्या गोष्टी हा वर्ग सोडतो, पण उमद्या व धीट मनाने नव्याला कधीहि सामोरा जात नाही. त्यामुळे गेल्या तीस-चाळीस वर्षांत देशांत निर्माण झालेले नवे प्रवाह, समाजांत उत्पन्न झालेल्या नव्या शक्ति यांची योग्य ती चाहूल या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वर्गाला कधीच नीट घेतां आली नाही. डोळ्यासमोर इतिहास घडत असतां हा इतिहासाभिमानी वर्ग गतेतिहासाचीं गौरवगीतें गाण्यांत स्वतःला धन्य मानीत होता. वास्तवाशी संबंध नाही, जुन्यानव्याच्या समन्वयाचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न नाही, यामुळे या वर्गाच्या साऱ्या धडपडी, या वर्गानें उराशी वाळगलेल्या संघटना व तत्त्वज्ञानें सामाजिक दृष्ट्या आजवर वांझोटी ठरत आलेलीं आहेत.

नव्याचा जो स्वीकार आजवर या वर्गानें केलेला आहे तोहि वरीष्ठांच्या नकली अनुकरणांतून उचललेला आहे. वास्तविक या वर्गाची नैसर्गिक पाळेमुळें श्रमजीवी जनतेच्या जमिनींत रूजायला हवींत. परंतु आपल्या या स्वाभाविक मूळाकडे लक्ष न देतां शहरांतील हा कनिष्ठ मध्यमवर्ग वृक्षशाखेवर रेंगाळणारीं सोनेरी सूर्यकिरणें पकडण्यांतच जीवनाची इतिकर्तव्यता मानीत आहे. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या श्रमजीवींच्या धगधगत्या संसाराशीं आपलें नातें जीडण्याऐवजीं लब्धप्रतिष्ठितांच्या राजीव कुरणांत प्रवेश मिळविण्याची या वर्गाची धडपड चालू असते. ऑफिसांत वरीष्ठांची सेवाचाकरी आणि घरादारांत उच्चकुलीनांच्या 'फॅशन्स' ची आणि सुखसोयींची उसनवारी यांत गुरफटलेला हा आजचा कनिष्ठ मध्यमवर्ग सर्व समाजाला प्रभावित करील असें रसरशीत व उठावदार नेतृत्व निर्माण करण्यास आज पूर्ण असमर्थ आहे. वर्वे का म्हाळगी असा पेंच येथील गरीब पांढरपेशा संस्कारांत वाढलेल्या मतदारासमोर उभा राहिला असतां अनेकांनी बर्वे यांनाच अग्रक्रम द्यावा यांतच त्यांच्या अंतःकरणाची ओढ कोठल्या दिशेला आहे तें व्यक्त होतें. मत मागण्यासाठीं म्हाळगींनी घरीं येणें मतदाराला विशेष महत्त्वाचें वाटत नाहीं. पण बर्व्यांसारखा एकेकाळचा कलेक्टर–कमिशनर पायउतार होऊन घरीं येतो यांत त्याची दबत चाललेली प्रतिष्ठा त्याला वर आल्यासारखी वाटते आणि बर्व्यांच्या गुणांचा तो एक चहाता बनून जातो. कांग्रेस की जनसंघ हा प्रश्न नसून बहुतेक ठिकाणीं हा वर्वे की म्हाळगी असा प्रश्न ठरतो आणि वर्वे आपल्या पदसिद्ध मोठेपणामुळे प्रतिस्पर्ध्यावर मात करतात. सांस्कृतिक दृष्ट्या जीर्ण मतांना कवटाळूनबस-


र. नं. १०१९६ — विना सहकार नहि उद्धार — र. ता. २८-६-१९४६

सभासदांना कर्ज देणें, अधिक उत्पादनासाठी शेतकऱ्यांना खतें, पेण्ड व सफेल्ट पुरविणें, त्याचप्रमाणे इंजिन्सची सर्व प्रकारची तेलें व इंजिन्स स्पेअर पार्टस् पुरविणारी 'अ' वर्गातील. . . . .

# कोल्हार (बु.) विविध कार्यकारी सहकारी

## ★ सोसायटी लि. मु. पो. कोल्हार (बु.) ★

ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

● सभासद संख्या ६७६ ● शेअर भांडवल ४,९९,२५५ ● रिझर्व व इतर फंड ८३,८३६ ● इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल १,४१,००० ● खेळतें भांडवल १८,१७,५७८ ● एकूण उलाढाल ७४,१६,४०७ ● सोसायटीच्या सभासदांच्या उंसाचें क्षेत्र १२९० एकर ● सोसायटीच्या ३०० सभासदांनी 'प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याचे' शेअर्स घेतले आहेत ●

– व्हा. चेअरमन –
श्री. शंकरराव एकनाथ पाटील (खर्डे)

– चेअरमन –
श्री. शंकरराव अहिलाजी निबे

– सेक्रेटरी –
श्री. सी. एन. राऊत

**ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणांत कर्ज पुरवठा करणारी संस्था**

लेला व सामाजिक-आर्थिक दृष्टचा वरिष्ठ पांढरपेशांच्या वर्चस्वाखालीं वावरणारा हा गरीब मध्यमवर्गच जोंपर्यंत म्हाळगी-जनसंघ यांचा पाठीराखा आहे तोंपर्यंत शिवाजीनगर मतदारसंघांतील यशापयशाचें हें चित्र महाराष्ट्रांत इतर ठिकाणींहि दिसून यावें यांत आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

या दृष्टिकोणांतून पाहिलें तर जनसंघीयांच्या प्रचारमोहिमेंतील गुणदोषांची नीट संगति लावतां येते. त्यांच्या प्रचारमोहीमेंतील दोष हें त्यांच्या प्रामाणिक गैरसमजुतीवर आधारलेले होते; अविकसित सामाजिक दृष्टिकोनाचा तो परिपाक होता. पंचवार्षिक योजनांवरील जनसंघीयांची टीका, त्यांनी केलेली महागाईमीमांसा म्हणजे परिस्थितीने होरपळलेल्या गरीब मध्यमवर्गीयांचीं ' आक्रंदनें ' होतीं. तुलनाच करावयाचीं तर समाजवादी पक्षाच्या श्री. कुलकर्णी व श्री. लिमये यांचा यासंबंधीचा दृष्टिकोन कितीतरी साफ व वस्तुनिष्ठ होता. निवडणुका हें लोकशिक्षणाचें साधन मानलें तर समाजवादी पक्षाच्या ५-२५ सभांनी जनसंघांच्या त्यापेक्षा चौपट तरी अधिक झालेल्या सभांपेक्षा तें अधिक प्रमाणांत साधलें आहे ही गोष्ट त्या लहानशा पक्षाला निश्चितच भूषणावह आहे. त्याचप्रमाणे बर्वे यांना पानशेत प्रकरणांत गोवण्याचा म्हाळगी यांनी केलेला प्रयत्न, बर्वे कम्युनिस्ट आहेत हा शोध, दिल्ली जिंकल्याच्या जनसंघीयांच्या पोरकट घोषणा या सर्वांचें मूळ तोकडी विचारसरणी हें आहे. कोंडींत सांपडलेल्या व्यक्तीच्या प्रतिकारांत जी असंबद्धता व विकारवशता दिसते तीच या जनसंघीयांच्या सर्व प्रचारांत दिसून येते. मात्र जनसंघाने मिरवणुकींत ' नेहरू मौत ' च्या घोषणा केल्या, श्री. बर्वे यांच्या पत्नीनें लिहिलेलें चोपडें पक्षप्रचारासाठी राबविलें इत्यादि आरोप विरोधक जनसंघीयांवर करतात त्यांत तथ्य दिसत नाही. जनसंघाच्या प्रचाराचें एकंदर स्वरूप पाहतां अशा प्रकारची ' सांस्कृतिक असभ्यता ' या पक्षाच्या व त्याच्या कार्यकर्त्यांच्या 'स्वभावधर्मांत ' न बसणारी आहे एवढेंच यासंबंधी येथे म्हणतां येईल.

## दोन हिंदुत्वनिष्ठांची फारकत

निवडणुकीला उभ्या असणाऱ्या चार उमेदवारांपैकीं या दोन उमेदवारांतच खरी लढत झाल्याने त्यांचाच विचार येथे प्रामुख्याने केला. समाजवादी पक्षाचे श्री. लिमये केवळ पक्षप्रचारासाठीच निवडणुकीला उभे असल्यानें त्यांच्या यशापयशाचा विचार करण्याचें तूर्त कारण नाही. समितीच्या तिकिटावर उभे असलेले हिंदुसभेचे श्री. नलावडे यांना केवळ चार हजार मतें मिळालीं असलीं तरी जनसंघ-हिंदुसभा ही परस्परांपासून आता कायमची विलग झाली हें निदर्शनास येण्याच्या दृष्टीने ही लढत उपयुक्तच ठरली. अनेकांना दोन हिंदुत्वनिष्ठ संघटनांमधील ही फाटाफूट मनस्वी दु:खदायक वाटते. परंतु ' हिंदुत्वनिष्ठा ' जरी समान असली तरी दोन भिन्न तात्विक भूमिकांवरून सामाजिक घडामोडींकडे पाहणारे हे दोन्ही पक्ष आपपला वेगवेगळा मार्ग आक्रमूं लागले हें सामाजिक प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट तेंच झालें. 'क्रांतिवाद' आणि 'वैज्ञानिक बुद्धिनिष्ठा' हे सावरकर-तत्त्वज्ञानाचे दोन डोळे स्वातंत्र्योत्तर काळांत हिंदुसभेला अपरिहार्यतेने कट्टर डाव्या विचारसरणीकडे आकृष्ट करणार हें उघड आहे याउलट जनसंघाचें परंपरारक्षणाचें स्थितिशील धोरण या पक्षाला उजवें स्वरूप देण्यास कारणीभूत ठरत आहे. उभयतांचा पुढील प्रवास ते किती प्रमाणांत आजचा संकुचित हिंदुत्ववाद सोडतील यावर अवलंबून आहे. परंतु दोघांचे प्रवास यापुढे भिन्नभिन्न दिशेने होणार कदाचित् एकमेकांशी उघड संघर्षाचाही प्रसंग येणार हें या निवडणुकींतील म्हाळगी-नलावडे लढतीने जरूर सूचित केलें आहे.

## नव्या नेतृत्वाचें स्वरूप

महाराष्ट्राच्या नव्या नेतृत्वाचें स्वरूप समजण्याच्यादृष्टीनेंहि ही निवडणूक कांही प्रमाणांत उपयुक्त ठरावी अशी कल्पना आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत महाराष्ट्रांत विकासकार्याचें जें नवें पर्व सुरू झालें त्यामुळें ग्रामीण विभागांतील सधन शेतकरी व शहरी विभागांतील कारखानदार यांचें स्थान अधिकच बळकट झालेलें आहे. कूळकायदा, सहकारी चळवळ विकासयोजना यांतून खेडेगांवांतील बागायतदारवर्ग अधिक प्रबळ झाला तर सरकारने उद्योगधंद्यांना दिलेल्या संरक्षणामुळे व कर्जपुरवठ्यांमुळे मूळचेच मूठभर कारखानदार अधिक कारखान्याचे मालक बनले. महाराष्ट्रांत आज खऱ्याखुऱ्या अर्थानें 'औद्योगिक क्रांतीचा' आरंभ झालेला आहे. या औद्योगिक क्रांतीला पोषक ठरेल असें नेतृत्व श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या रुपाने महाराष्ट्राला लाभलें असल्यानें कॉंग्रेसची शक्ति आज वाढलेली आहे. बुद्धिजीवी वर्गाच्या सहयोगाशिवाय औद्योगिक क्रांतीचें हें कार्य स्थिरावणार नाहीं याची कॉंग्रेसच्या विद्यमान नेतृत्वाला जाणीव असल्याने त्यांनी अनेक सांस्कृतिक कार्यांना प्रोत्साहन देऊन, कॉंग्रेससंघटनेतील जातीयता कमी करण्याचा प्रयत्न करून हा बुद्धिजीवी वर्गाचा सहयोग संपादण्याचा आजवर मन:पूर्वक प्रयत्न केलेला आहे. श्री. बर्वे यांचें कॉंग्रेसमधील पदार्पण हा याच प्रयत्नांतील आणखी एक पुढचा टप्पा होय.

खेड्यांतील वरीष्ठ पांढरपेशा वर्गाचें शहरांतील त्या पातळीवर वावरणाऱ्या पांढरपेक्षा समाजाशी होत असलेलें हें ऐक्य सामाजिक एकसंधतेच्या दृष्टीने आज जरूर स्वागतार्हच आहे. पण त्याचबरोबर हें अपूर्ण आहे होहि जाणीव सतत मनांत बाळगणें अवश्य आहे सामाजिक एकता ही उभ्या-आडव्या धाग्यांनी विणलें गेलेलें एक अखंड वस्त्र मानलें तर हा केवळ आडवा धागाच आज विणला जात आहे असें दिसून येईल. शहरांतील गरीब मध्यमवर्गापासून तों मध्यम गांवातील लहानसहान उद्योगधंद्यांत गुंतलेल्या कारागीरवर्गापर्यंत कारखान्यांतील मजूरापासून तों शेतांतील शेतमजूरापर्यंत श्रमजीवी-बुद्धिजीवी यांच्या एकतेचे उभे-आडवे धागे जेव्हा एकाच वेळीं विणलें जातील तेव्हाच खऱ्या अर्थानें समाज एकसंध होईल, राष्ट्रीय होईल, 'समाजवादी समाजरचने'चा होईल. आजचें नेतृत्व औद्योगिक क्रांतीची हमी महाराष्ट्राला देण्यास जरूर समर्थ आहे. पण औद्यगिक क्रांतीबरोबर येणारी आर्थिक व सामाजिक विषमता वाढीस लागणार नाहीं, कनिष्ठ बद्धीजीवी व श्रमजीवी यांचे हितसंबध या क्रांतीच्या संचलनांत भरडले जाणार नाहीत ही हमी देण्यावरच आजचें नेतृत्व 'समाजवादी' आहें की नाही याचा कस लागणार आहे. महाराष्ट्राचें नवें नेतृत्व या कसोटीस उतरलें तर तें एक 'ऐतिहासिक' नेतृत्व ठरावें एवढें त्याचें मोल आहे. हें मोल त्यास लाभावें अशी आशा आहे.

★ ★ ★

# आचार्य अत्रे



मराठी माणसाला अत्रे म्हणजे काय विचारलं तर तो अगदी सहज सांगून जाईल— अत्रे म्हणजे 'हशा आणि टाळ्या'

तीन शब्दांत मांडलेलं अत्र्यांचं हें शब्दचित्र त्यांना चपखल लागू पडतं. मराठी मनांत अत्रे 'हशा आणि टाळ्या' यांनीच ठाण मांडून बसले आहेत.

'हशा व टाळ्या' निर्माण करणाऱ्या अत्रे यांच्या साहित्याची एक गम्मत आहे. त्यांचा हल्ला कुणावर आहे हें त्यांचे वाचक (श्रोते) कधी फारसे लक्षांत घेत नाहीत. इथे कुणाची तरी भंबेरी उडणार एवढेच त्यांना पुरेसें असतें. भरपूर हसायला मिळणार हाच भाव बहुतेकांच्या मनांत असतो.

अत्रे यांची लोकप्रियता अशी करमणुकीवर आधारलेली आहे. पण अत्रे यांच्या विनोदाचा मोठा विनोद असा आहे की, त्यांचा, आपल्या विरोधी पक्षावरचा हल्ला मात्र अगदी मनापासून असतो. अत्रे वारंवार पक्ष (राजकीय किंवा इतर) बदलतात तो अगदी पटून बदलतात. पण त्यांचे चहाते अत्र्यांची कोणतीच भूमिका कधी मनावर घेतांना दिसत नाहीत. अत्रे यांनी कांही आवर्जून सांगावे नि लोकांनी म्हणावे,—'ठीक आहे ! पण त्या तुमच्या मस्त कोटया ऐकूं द्या.'

अत्रे यांच्या आयुष्यांतला हा मोठा करुण भाग आहे. त्यामुळेच अत्रे यांचा विनोद त्यांना स्वतःला, वाङ्मयाला, राजकारणाला नि एकंदर समाजाला हवा तेवढा पोषक झाला नाही. कित्येकदा केवळ हसवण्याचीच भूमिका अत्रे यांना घ्यावी लागली आहे. आपले विनोद कुठून कुठे जात आहेत याचाहि विचार त्यांनी केला नाही.

पण याचा सर्व दोष अत्र्यांकडेच येत नाही. दोष, मराठी जनतेच्या विकृत मनीवृत्तीकडेहि येतो. वैयक्तिक उखाळ्या-पाखाळ्या हीच आमची विनोदाची कल्पना होऊन बसली आहे. वेड्यावाकड्या कोट्या नि बीभत्स शब्द ही आमच्या विनोदाची पातळी बनली. महाराष्ट्राला हीन विनोदाचा शापच आहे असें कधी कधी वाटूं लागते. इंदूबिंदूच्या निर्दय विनोदावर आमच्या तीन पिढ्या हसत रहाव्यात याचा अर्थच कळत नाही. अत्रे यांच्यासारखा विनोदी लेखक कांही दर आठवड्यास निर्माण होत नाही. त्याचें वळण बिघडवण्याचें कांही 'श्रेय' तरी मराठी जनतेला आहे.

अत्रे यांचें सर्वच लिखाण खालच्या दर्जाचें आहे असें कुणीच म्हणणार नाही. अत्रे यांची प्रतिभा दारूकामासारखी रंग उधळीत जेव्हा कधीं आकाशांत जाते तेव्हां— 'स्त्री ही क्षणकालची पत्नी नि अनंत कालची माता आहे—' अशीं वाक्यें प्रसवतें. एखाद्या रविकिरणमंडळांतल्या नीरस काव्यांनी लोक जेव्हा हैराण होतात तेव्हा त्यांचें झक्क विडंबन करून अत्रे लोकांची सुटका करतात. अगदी रूक्ष असा सुएझ कालव्याचा प्रदेशहि एक सहजसुंदर काव्य निर्माण करायला त्यांच्या लेखणीला पुरतो. त्यांचे प्रेमीजन धीट, सहजसुंदर प्रेम करतात नि प्रेमांत अपराधी वृत्तीला थारा देत नाहीत.

आपल्या आरंभीच्या लिखाणांत अत्रे यांनी जी लोकप्रियता मिळवली ती यामुळेच. हें करूं नका तें पाप आहे असेंच वागा नि असेच लिहा ही सरंजामी दडपणें अत्रे यांनी साफ उधळून लावलीं. म्हणूनच त्यावेळची तरुण पिढी त्यांच्या मागे धावत आली.

तसा अत्रे यांचा स्वभाव मोकळा आणि मन विलक्षण भावनाप्रधान आहे. त्यांना जें आवडलं त्याची त्यांनी आकाशाएवढी स्तुती केलीच समजावी. त्यांत त्यांनी हातचं कधी राखलं नाही. पण नंतर त्याच व्यक्तीचं त्यांना कांही आवडलं नाही तर त्याला त्यांनी धुळींत खेचलाच. तिथेहि त्यांनीं हातचा ठेवला नाही. कुठे अन्याय झालासा त्यांना वाटला की ते तुटून पडलेच. कुठे दुःखद घटना घडली की त्यांची लेखणीहि अश्रू ढाळूं लागते.

अत्रेंसारख्या स्वभावाच्या माणसाला देवघेवीचें तत्त्व मान्य नसते. विनोबा भावे जेव्हां पटले तेव्हा त्यांनी तो सर्वश्रेष्ठ पुरुष ठरवला.

# मला दिसलेले लेखक

## २

पण जेव्हा त्यांचे कांही चुकले तेव्हा अत्रे यांनी त्यांना खाली खेचण्यासहि कमी केलें नाही. पुष्कळांना ही विसंगती वाटते. पण एखादा माणूस चांगला आहे ना मग तो सगळीकडेच चांगला वागला पाहिजे हा अत्रे यांचा हट्ट असतो. आणि चांगलें कोणते किंवा वाईट कोणते हें ठरवतांना अत्र्यांना जें चांगलं-वाईट वाटतं तेंच अत्रे खरे मानतात.

शिक्षण, काव्य, कथा, कादंबरी, नाटक, संपादन नि राजकारण इत्यादि विविध क्षेत्रें अत्र्यांनी हाताळलीं. एकदा एका क्षेत्रांतून पुढें गेल्यावर अत्रे यांनी मागे पाहिलें नाही. या प्रत्येक वाढत्या क्षेत्रांत त्यांचा चाहता समुदाय वाढत गेला. त्यामुळे समुदायाला कळेल अशा पातळीवरून बोलण्याची त्यांना संवयच लागली· हळूहळू ते समुदायासारखेच बोलूं लागले.

अशा झटापटींत समाजांतील खालच्या माणसाइतके ते खाली गेले. खालीच जात राहिले. एकदा अत्रे वाहवले—मग समाज वाहवला—पुन्हा ते वाहवले—पुन्हा समाज वाहवला आणि दोघे खाली येत राहिले. अत्रे यांची लेखक—पत्रकार म्हणून जी जबाबदारी-लोकांना वर आणण्याची-ती त्यांनी पार पाडली नाहीं.

अत्रे यांचें वाङ्मय किती टिकेल हा प्रश्न जरा विचित्र आहे. अत्र्यांच्या बाबतींत एवढंच म्हणतां येईल की अत्रे यांनी जें गंभीर म्हणून लिहिलें तें लोकांना जोपर्यंत विनोदी वाटत नाही किंवा विनोदी म्हणून लिहिलेलें गंभीर वाटत नाहीं तोपर्यंत त्याचं वाङ्मय टिकाव धरील. थोडक्यांत आज विनोदाची जी कल्पना आहे ती बदलणारी अशी जबरदस्त घटना घडली तरच अत्रे यांचें वाङ्मय लोकांचे मनांतून बाहेर येईल.

विनोदाच्या या आकर्षणाइतकीच अत्रे यांच्याबद्दल लोकांच्या मनांत जी दुसरी भावना आहे ती त्यांच्या हयातींत त्यांना लोकप्रिय ठेवील. लाखो लोकांना अत्रे यांचा आज दिलासा वाटतो. राज्यकर्ते कोणत्याहि पक्षाचे असोत, लोकांना नेहमी त्याची धास्ती वाटत असते. अशा वेळी निर्भीडपणें त्यांच्या दोषावर लिहिणारा, कुठे ढोंग, लबाडी, लांचखाऊपणा दिसला की तो बाहेर काढणारा लोकांना हवासा वाटावा यांत नवल नाहीं.

अत्रे शेवटी एक विनोदी पुरुष म्हणूनच आपल्यापुढे उभे राहतील. त्या दृष्टीनं विचार केला की मात्र असें वाटतें की अत्रे यांच्या विनोदबुद्धीला चिंतनाची जोड असती तर किती चांगलें झालें असतें ! भावनाप्रधानतेमुळे त्यांनी अनेकदा जो अतिरेक केला, तो टळला असता, त्यांत त्यांची खर्च झालेली शक्ति वांचली असती. समुदायाबरोबर चालता चालता त्यांची बुद्धी ही आज समुदायाच्या बुद्धीइतकी होते, तसें झालें नसतें. त्यांचा विनोद अधिक प्रौढ नि खोल झाला असता. समुदायाची उंची त्यांना उंचावता आली असती.

पण तसें व्हावयाचें नव्हतें. वाङ्मयीन आत्मशोधन म्हणून लिहिलेल्या आत्मपर पुस्तकांत अत्रे यांच्या विचाराची उंची कुठे वाढलेलीच वाटत नाही. एखाद्या कैकाडीबुवानं द्यावेत तसे तुकारामांच्या गाथ्यांतले उतारेच्या उतारे त्यांना द्यावे लागावे, किंवा समाजवादाचा घाऊक संदेश फेकावा लागावा—यांत त्यांना स्वतःचे विचार नाहीत हें तर कळतेंच पण एवढ्या प्रतिभेचा माणूस असा असावा याचें वाईट वाटतें.


याच पुस्तकांतील 'मी कोण आहें' एवढें प्रकरण वाचलें की अत्रे या व्यक्तीचें तात्पर्य सहज काढतां येतें तें असें—

'अत्रे म्हणजे एक अत्यंत भावनाप्रधान चंचल, प्रतिभावान मनाचा गोंधळ आहे.'

आणि असें कांहीतरी तात्पर्य काढलें तरच अत्रे यांच्यासारख्या अघटित व्यक्तीचा मागोवा घेता येतो.

**'मी'**

स्वादिष्ट मिठाईके लिये !
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदीरके पास, मार्केट रोड, पूना २.



# नगर जिल्हयांतील एक लोकप्रिय इंजिन

## ★ ज वा ह र ★

**आ**ज भारतांत आडव्या इंजिन्सचे पुष्कळच कारखाने आहेत. परंतु उभ्या इंजिन्सची गरज भागविणारे कारखाने मात्र त्या मानाने फारच कमी प्रमाणांत आहेत. उभ्या इंजिन्सची वर्कमनशिप व मशिनरीची अॅक्युरसी या दोन बाबतीत उभ्या इंजिन्सचा दर्जा उच्च प्रतीचा ठेवणें हें मोठया जिकिरीचें व कष्टसाध्य काम असतें. म्हणूनच भारतांत आज उभ्या इंजिन्सचें उत्पादन कमी प्रमाणांत आहे.

अहमदनगर जिल्हयांतील श्रीरामपूर येथील 'विजय इंजिनिरिंग अॅन्ड मेकॅनिकल-वर्क्स' या कारखान्यांत 'जवाहर' हें उभें डिझेंल इंजिन तयार होतें. 'जवाहर' इंजिन्सच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या सर्व सुटया भागांसाठी लागणारे कास्टिंग या फॅक्टरीच्या मालकीच्या फौंड्रीतच ओतले जातात. या कारखान्याची कार्यपद्धती व यंत्र-सामुग्री सुसज्ज, आधुनिक असल्यानें 'जवाहर' साठी लागणारे जवळ जवळ ७० टक्के भाग हे याच कारखान्यांत तज्ञांच्या खास मार्गदर्शनखाली तयार करण्यांत येतात. इंजिनचा प्रत्येक भाग हा निर्दोष, तंतोतंतपणा यांत उच्चप्रतीचा ठरल्याशिवाय त्याचा इंजिन्समध्ये वापर केला जात नाही.

इतक्या काळजीपूर्वकतेने संपूर्ण 'जवाहर' इंजिन्स् तयार होतात. इंजिन जोडून पुरे झाल्यानंतर कारखान्यांत इंजिन्सच्या टेस्टींगसाठी अद्यावत प्रकारची मिटर्स व गेजेस वापरण्यांत येतात व इंजिन्स कसोशीनें तपासली जातात नंतर ग्राहकाकरिता बाजारांत पाठविली जातात. इंजिनच्या स्टॅण्डर्डकरिता नेमला गेलेला तंत्रज्ञ व कामगार वर्ग हा जास्त कार्यक्षम तांत्रिक शिक्षणाने व अनुभवानें परिपूर्ण असणारा असाच आहे.

'जवाहर' हें ५ अश्वशक्तीचें इंजिन असून त्याचा आज नगर, पुणें, सोलापूर, गुजरात, आंध्र जिल्हयांतील शेतकरी व बागयतदार मोठया प्रमाणांवर वापर करीत आहेत. या इंजिनबरोबर ३" × २॥" चा बेसप्लेटवर डायरेक्ट कपल्ड असा D. P. F. चा पंप सेटवर दिला जातो हा पंपाचा सेट अनेक विहिरी, ओढे नाले यांवर फिरता ठेवण्याची खास सोय असणारा असल्याने आज तो शेतकऱ्यांत लोकप्रिय व विश्वासपात्र ठरलेला आहे. 'जवाहर' इंजिनचे सुटे भाग हे स्टॅंडर्ड साइझचे व भक्कम असल्याने कोणताहि शेतकरी हे सुटे भाग केव्हाहि मिळवूं शकतो. त्यामुळे हे इंजिन कोणीहि सहज रीतीनें चालवूं शकतो.

'जवाहर' हें इंजिन उपयुक्त व संपूर्ण चांचणीत उतणारे तर आहेच. परंतु तें महाराष्ट्र सरकारनें तगाईकरितां मंजूर केलेलें आहे. यावरूनच त्याची उपयुक्तता व श्रेष्ठता कोणाच्याहि ध्यानांत येण्यासारखी आहे.

★ ★

# स्वर्ग आणि नरक

## जपानी बौद्ध त्रिपिटकांतील एक बोधकथा

सदानंद चेंदवणकर

एकदा भगवान बुद्ध स्वर्गांतील एका जलाशयाच्या किनाऱ्याने सहज फिरत होते. त्या जलाशयांत कमळें प्रफुल्लित झालीं होतीं; कमलपत्रांवर जलकण मोत्यासारखे चमकत होते. अन् पारिजातकाच्या मंदमंद सुगंधानें स्वर्गलोकींचा कोना कोपरा सुगंधित झाला होता.

फिरतां फिरतां भगवानांनी स्फटिकासमान पारदर्शी अशा त्या जलाशयांत सहज डोकावून पाहिलें तों काय ! साक्षात् रक्तिम नरक पुरीचें त्यांना दर्शन झालें ! कितीतरी पापात्मे आपल्या दुष्कृत्यांचीं फ़ळें त्या नरकपुरींत भोगीत खितपत पडलेले होते. एकाएकी भगवानांची दृष्टि कादान्त नामक एका डाकूवर गेली. गेले कित्येक दिवस तो नरकपुरींतील असह्य यातनांमुळें बेजार झाला होता.

भगवानांच्या नयनांपुढे कादान्ताची सारी जीवनकथा उभी राहिली. त्याने सारें जीवन चोऱ्या आणि दरोडे घालण्यांत व्यतीत केलें होतें. किती निरपराध जीवांची त्याने हत्या केली होती, याची तर मोजदादच नव्हती. परंतु असें जरी असलें तरी त्याने एका कोळ्याचे प्राण वांचविले होते. ती घटना अशी—

एकदा कादांताची स्वारी लुटलेली धनदौलत घेऊन मारे मोठ्या आनंदांत चालली होती. इतक्यांत त्याला असें आढळलें की, एक षट्पाद कोळी आपल्या पायाखालीं अगदी चिरडला जाणार ! कोणत्यातरी एका अज्ञात प्रेरणेने त्याचे पाय तेथल्या तिथे थबकले नि अशा प्रकारे त्या बिचाऱ्या कोळ्याचे प्राण बचावले.

जीवदयेच्या या सत्कृत्याचें स्मरण होऊन दयाळू भगवानांचें हृदय द्रवलें आणि नरक यातनांतून कादान्ताला कसें मुक्त करतां येईल याचा ते विचार करूं लागले. अगदी याच वेळीं त्यांची दृष्टि जाळें विणीत असलेल्या एका कोळ्याकडे गेली. एका झाडावर आपल्या पोटावाटें निघणाऱ्या कांहीशा चांदी सारख्या दिसणाऱ्या चकचकीत धाग्याद्वारे तो आपलें जाळें बनवीत होता.

भगवानांनी त्या कोळ्याच्या जाळ्यांतला एक धागा घेतला आणि नरकपुरीच्या दिशेने सोडला.

इकडे नरक पुरींतील घोर अंधःकारांत कादान्त तीव्र वेदना भोगीत होता. त्या वेदना असह्य झाल्यामुळेच की काय, तो दीनपणें कण्हत कुंथत होता. इतक्यांत एकाएकीं त्याची दृष्टि वर गेली. तों काय आश्चर्य! एक प्रकाशमय धागा स्वर्गांतून निघून त्याच्या रोखाने येत होता. हर्षातिरेकाने त्याहि अवस्थेंत त्याचें मन नाचूं लागलें. " धन्य ! भगवानांच्या कृपेमुळें खाली खाली येणाऱ्या या मुक्तिरज्जूला पकडून वर कुठेहि चढून गेलों तर एकदांचा सुटेन का मी या नरकयातनांतून ! अन् समजा, जर या धाग्याचें दुसरें टोक स्वर्गाकडेच गेलेलें असलें तर किती बहार होईल ! " त्याच्या मनांत विचार उद्भवले.

एव्हांना तो कोळ्याचा धागा त्याच्या निकट येऊन पोचला होता. हर्षोन्मत्त होऊन त्या धाग्यास लोंबकळून तो वर चढूं लागला. अशा प्रकारे वर चढण्यांत तो जरी निपुण होता तरी आता त्याचे शरीर जर्जर झालें होतें. त्यामुळे कांही थोडें अंतर वर चढून गेला असेल तोंच तो थकला. विश्रांति घेण्यासाठी तो थांबला. इतक्यांत सहज त्याने मागे वळून पाहिलें, तो काय ! धाग्याला धरून त्याच्या प्रमाणेच अनेक नरकनिवासी त्याच्या पाठोपाठ वर वर येत होते ! तें पाहिल्यावर कादान्ताला राग आला. मोठ्या आवेशाने त्याने त्या सर्वांना उद्देशून म्हटलें- " अरे नरकनिवासियांनो, तुम्ही माझ्या पाठोपाठ कां येत आहांत, चला ? उतरा खाली ! नाहीतर हा धागा कापून टाकीन ! हा धागा खास माझ्यासाठी सोडण्यांत आलेला आहे ! चला, उतरा खाली पाप्यांनो ! "

आपले शेवटचे शब्द त्याने एवढ्या जोराने उच्चारले की, त्यासरशी धाग्याला जोराचा हिसडा बसला आणि तो धागा एकदम तुटला !

—आणि जें व्हावयाचें तेंच झालें ! लाखो क्रोडो नरकवासियांबरोबर कादान्तहि पुन्हा नरकपुरींत जाऊन आदळला. त्याच्या स्वार्थी भावनेचें त्याला योग्य प्रायश्चित्त मिळालें !

वर स्वर्गांत त्या स्फटिकमय सरोवराच्या काठाशीं उभे राहून भगवान बुद्ध हा सारा प्रकार पहात होते. कादांत पुन्हां त्या नरकपुरीत कण्हण विव्हळत पडलेला पाहून दयाळू बुद्धीच्या नि उपकारी वृत्तीच्या भगवानांनी निःश्वास सोडला अन् हेलावलेल्या अंतःकरणानें ते पुढे चालते झाले !


भारत सरकारकडून रजिस्टर केलेले

**पांढरे डाग**

१९३६ पासून प्रसिद्ध व हजारोंनीं प्रशंसापत्रें पाठविलेलें शरीरावरील पांढऱ्या कोडाचें अजब गुणकारी औषध.

किंमत ५ रु. पो. ख. १। रु.

माहितीपत्रक मोफत मागवा

**दमा, श्वास** रोगावर अनुभविक


गुणकारी औषध किं. ५ रु. पो. ख. १। रु.

कोणत्याहि रोग्याचें प्रकृतीमान कळविल्यास त्यावर गुणकारी औषधें पाठवूं.

सूचना :– निंदक व धोकेबाजांपासून सावध रहावें.

वैद्य :– के. आर. बोरकर, आयुर्वेद भवन

मु.पो. मंगरुळपीर, जि. अकोला [महाराष्ट्र]



# श्रीनगर

## एक सौंदर्ययात्रा

सौ. कमला पेंडसे

*निळंशार आकाश. चमचम करणारे तारे. त्यांना पण तेज चढलं होतं कीं काय कोण जाणे ! तो मोठा हिमगिरी चंद्राच्या प्रकाशांत न्हाऊन निघाला होता. हो तेंच खिलनमर्ग ! तेंच अनेकांचं कुतूहलस्थान ! असंख्य रंगीबेरंगी पक्षी तेथे उडत असतील. झुळझुळ झरा वाहत असेल. कैलासावर वास करणारीं शंकरपार्वतीं कधींकधीं तेथे विहाराला येत असतील. निघतांना मनांत, उराशीं बाळगलेलीं तीं आशा अगदीं थोड्याच तासांत सफल होणार !*

बरेच दिवसांपासून आम्ही श्रीनगरला जायचे व्रत करीतच होतों. शेवटीं धाकट्या मुलाची मॅट्रिकची परीक्षा संपली की निघायचं असं ठरलं.

टाइम्समधल्या बहुतेक सगळ्या काश्मीर टूरच्या जाहिराती आम्ही पाहात होतों. पुष्कळशा एजंटबरोबर पत्रव्यवहार चालू होता. खर्चाचा अंदाज काढीत होतों. वाचनालयांतील मिळतील तेवढीं काश्मीर–प्रवासाचीं पुस्तकें वाचून काढीत होतों, कांही आशादायक कांही निराशादायक वर्णनें वाचलीं, पण गुलमर्ग आणि विशेष म्हणजे खिलनमर्ग पाहून मात्र प्रत्येकाचं मन आनंदाने नाचूं लागलेलं दिसत होतं.

शेवटीं आमचा निघण्याचा दिवस ठरला. टूरबरोबर जाण्यापेक्षां स्वतंत्र जायचं ठरलं. आमच्या मागेपुढे मुंबईहून व इतर ठिकाणाहून खूप टूर्स जात होत्या. तेव्हां आम्हांला उतरण्यास जागा मिळेल का नाही. साईट सीईंगला ' बसला जागा मिळेल का नाही. वगैरे खूप प्रश्न मनांत येतच होते. श्रीनगरमध्ये एकदा ' शिरकाव झाला की, जागेचें पुढे पाहूं असें ठरवून, ' ट्रेड अँड टूर ' च्या मुंबईच्या एजंटला आमचीं मुंबई ते श्रीनगरपर्यंतचीं परतीचीं तिकीटें रिझर्व्ह करायला कळवलं. तीन दिवस श्रीनगरच्या हॉटेलमध्ये जागा रिझर्व्ह केली. पठाणकोटच्या पुढे बसने प्रवास करतांना एक रात्र वाटेंत थांबावें लागतें, तिथे पुष्कळांचे हाल होतात, थंडी वाजते, म्हणून रात्रीच्या मुक्कामासाठी आम्ही बटोटला एक बंगला रिझर्व करून ठेवला.

३ मे रोजीं फ्रॉन्टीयरने मुंबईहून निघण्याचें ठरलें, हिरवेगार वृक्ष, ताजीं टवटवीत फुलं, झुळझुळ वाहणारी नदी पाहूनसुद्धा फार आनंद वाटतो, मग तर ह्या सर्व गोष्टींची जेथे निसर्गाने लयलूट केली आहे अशा ठिकाणीं आपण जाणार म्हणून मन अगदी हेरकून गेलं.

आमच्या तयारीला धडाक्याने सुरुवात झाली. गेल्या वर्षी आम्ही नैनी-तालका गेलों. त्या वेळीं फ्रॉन्टीयरमध्यें ह्या दिवसांत खूप गरम वाटलं.

आमच्या डब्यांत आम्ही तिघेच होतों. एका चवथ्या माणसाचा वरचा बर्थ होता. पण तो न आल्यामुळे आमचेंच राज्य ! वर खालीं बेडिंग्ज पसरून दिलीं. दुसरा दिवस उजाडला. रविदेवाने आपला कडाला सुरू केला. हाय, हुय, हुश्श करीत गार पाणी पीत दिवस गेला. पुढच्या थंडगार कल्पनेने, उष्मा जरा कमी वाटला. दिल्लीला जेवण घेतलं. आता मात्र न पाहिलेला, अनोखा प्रदेश दृष्टीस पडू लागला. सपासप सपासप आमची मेल भर वेगांत प्रचंड भूप्रदेश मागे टाकीत होती. रात्र संपली आणि गुरुवार दि. ५ रोजीं सकाळीं आम्ही पठाणकोटला दाखल झालों.

ब्रेक फास्टचीं कुपन्स आमच्याकडे आलीं होतीं. एजंटने येऊन आमचें सर्व सामान ताब्यांत घेऊन बसवर चढविलें. आम्ही पण चहा, टोस्ट, कॉर्नफ्लेक्स वगैरे सर्व घेऊन ताजेतवाने होऊन, आपापल्या जागीं बसलों. ९॥ च्या सुमारास बस सुटली. ५ मैल, १० मैल, १५


( पृष्ठ १४ वर पहा )

# तिरुचिरापल्ली

## एक भ्रमणचित्र

**प्रा. चंद्रकांत वर्तक**

*ह्या बाहेरच्या जगावर छाप पाश्चिमात्यांचींच आहे, पण म्हणून हें जुनं लुप्तावलेलं नाहीं. त्या जुन्यानं आपलं जग शाबूत राखलं आहे, तें मंदिरांमधून, तिथल्या शिल्पांमधून, आकाशांत जीं निमुळतीं होत गेलीं आहेत त्या गोपुरांमधून. ह्या गोपुरांमधून मनुष्य प्राकारांत शिरला कीं, स्वतःचा उरत नाहीं. तो त्या मंदिरांतल्या दगडादगडाचा होतो.*



'श्रीरंगम्' मंदिराचें एक प्रवेशद्वार

एगमोर !

मद्रासचें 'बॉम्बे सेंट्रल' म्हणजे एगमोर रेल्वे स्टेशन. अडयारहून मी परतलों आहें. आणि ह्या स्टेशनवर उभा आहें. येथें कांहींसं कोंदट वाटतं आहे–तरीहि तिथली स्वच्छता डोळ्यांत भरते आहे. इतर स्टेशनांवर आवाजांचे जे भमारे उठतात, ते भमारे येथेंहि उठत आहेत. इंजिनांची धुसफस, डब्यांची धडधड, प्रवाशांची वर्दळ आणि हमालांची धावपळ येथेंहि चालू आहे ; पण बोरीबंदरला चालू असलेला झुमकारीं लयींतला गोंधळ, गोंगाट येथें ऐकूं येत नाही आहे. दिसतो तो निवांतपणा भरून राहिलेला आणि प्रसन्नता–एखादा आवडीचा पदार्थ चवीनें खातांना जी प्रसन्नता असते, तीच–तशीच...

माझी गाडी फलाटाला लागते आणि 'झोपाळू डब्यां'तल्या माझ्या जागेवर मी माझी पथारी पसरतों. येथेच रात्रभर आरामशीरपणें मी पसरणार आहें. झोप लागली तर ठीकच, नाहीतर गाडीच्या खडखडाटाच्या लयींत ट्रिप्लीकेन बीचवरची पिवळट तांबडट वाळू आणि निळं पाणी मनासमोर उसळवणार आहे... अडयारची ती थिऑसॉफिस्टांची पिवळ्या रंगाची शांत वास्तु, आंतलीं पांढऱ्या रंगाचीं शिल्पं, मधल्या हौदांत मोठाल्या तबका-एवढ्या आकाराचीं पानं असलेलीं कमळं आणि वारुळं अंगावर उभीं राहिलीं तरी निश्चलपणें तपश्चर्येंत मग्न असलेल्या ऋषीसारखा स्थितप्रज्ञ वड आणि 'ना आदि ना अंत' ची अश्वत्थासारखी ग्वाहि देणाऱ्या पारंब्या डोळ्यांसमोर झुलवणार आहें ... आयत्या बिळांत नागोबा बसावा त्याप्रमाणे हायकोर्टाच्या इमारतीवर वसलेल्या लाइट हाऊसवरून दिसणारं संध्याकाळचं गजबजतं मद्रास भुरुभुरु धावणाऱ्या टॅक्स्या, चौदा मजल्यांची एल्. आय्. सी. ची. इमारत नाचवणार आहे ... तेथून उतरतां उतरतां समोरच्या पिवळ्या चर्चचा क्रूस पाहणार आहे... तेथून उतरतां उतरतां समोरच्या पिवळ्या चर्चचा क्रूस पहाणार आहें... त्या चर्चमध्ये मग मला क्लाईव्ह दिसेल, त्याची सहचरी दिसेल आणि क्लाईव्हला 'मम म्हणायला सांगून लग्नावेळच्या शपथा सांगणारा प्रीस्टहि ! ...

पथारी पसरतां पसरतांच मला हें डोळ्यांसमोर दिसूं लागतं आणि मग एकदम क्लाईव्हवरून चंदासाहेबाची आठवण होते–लगोलग तिरुचिरापल्लीचीसुद्धां...


होय, मी तिरुचिरापल्लीला निघालों आहें...

कमानी–कमानींची ही तिरुचिरापल्ली स्टेशनची इमारत स्वतःहूनच ह्या स्टेशनबद्दल चांगला ग्रह करून देते. लांबून तर ती एखाद्या राजवाड्यासारखी वाटते. स्टेशनाच्या आवारांत टॅक्स्या उभ्या असतात–टॅक्स्या कसल्या–खाजगी गाड्याच, कारण टॅक्सीची एकहि खूण त्यांचेपाशी नसते. ड्रायव्हर लोक सांगतात म्हणून–नाहीतर इतक्या चकचकीत पॉलिशलेल्या, तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या, गुबगुबीत गाद्या असलेल्या ह्या अॅम्बॅसॅडर्स मालकाला नाहीतर मालकिणीला घरीं नेण्यासाठी स्टेशनाच्या आवारांत शिरल्या आहेत असं वाटण्याला हरकत नव्हती.

स्टेशनचें आवार प्रशस्त आहे आणि त्या आवारांतूनच शहराकडे जाणारा रस्ता निघाला आहे. फर्लांगभर तो सरळ जातो आणि मग त्याला चोहीकडे वाटा फुटतात. ह्या चौकावर छोटीशी बाग आहे आणि तींतून निलगिरीचीं झाडं डोकावतात. तेथून पुढें हा रस्ता वळणं घेत घेत शहरांत पोचला आहे. शहर बरंच दूर आहे, कारण अर्ध्या–पाऊण मैलाच्या परिसरांत तरी शहरांतला तो धिधिडगा ऐकूं येत नाही की दृष्टीस पडत नाही...

टळटळीत दुपार झाली आहे, आणि मी ह्या चौल व पल्लव राजांनी उभारलेल्या नगरींतून भटकतों आहें. आता तेव्हांचं असं कांहीच दिसत नाही–म्हणजे बाहेर. ह्या बाहेरच्या जगावर छाप पाश्चिमात्यांचीच आहे. पण म्हणून हें जुनं लुप्तावलेलं नाही. त्या जुन्यानं आपलं जग शाबूत राखलं आहे.. तें

मंदिरांमधून, तिथल्या शिल्पांमधून, आकाशांत जीं निमुळतीं होत गेलीं आहेत त्या गोपुरांमधून. ह्या गोपुरांमधून मनुष्य प्राकारांत शिरला कीं स्वतःचा उरत नाही. तो त्या मंदिरांतल्या दगडा–दगडाचा होतो. त्याचं मन ह्या प्राचीन जगांत प्रचलित जगांचं भान विसरत विसरत शिरतं—तें जग हल्लींच्या जगाला उभ्या (!) रेषांचा छेद देत देत आपलं अस्तित्व टिकवतं .....



गणेशाचें देऊळ

ऊन चांगलंच भासतं आहे आणि मी पायऱ्या चढतों आहें. ह्या पायऱ्या पर्वतीच्या पायऱ्यांनी सपाट व्हावं अशा आहेत—नुसत्याच त्या तशा नाहीत तर त्यांच्या विविध अवस्था आहेत. कधी त्या शिडीसारख्या सरळसोट ऊर भरून टाकणाऱ्या तर कधीं एकमेकींची पाठ धरत भिडलेल्या—जणूं एकींतून दुसरी उद्‌भवलेली, लाटेंतून लाट भिडत भिडत निघावी तशी. कुठे त्या ढोपराइतक्या उंचीचं अंतर एकमेकींत वागवणाऱ्या तर कुठे पावलाइतकीच उंची राखून एकमेकींत समतेचा भास निर्माण करणाऱ्या. डोंगर फोडून खिंड निर्माण करावी तशा त्या सुळकेवजा खडकांत दोन्ही बाजूंनी चिरा पाडत पाडत ह्या पायऱ्या तयार केलेल्या. कितीएकांनी त्या आजपर्यंत चढल्या आहेत. म्हणूनच त्याच्यामधल्या खांचा, खोबणीं नाण्यासारख्या झिजून गेल्या आहेत आणि त्या गुळगुळीत झाल्या आहेत. उच्च विचार उंच ठिकाणीं करावे असें म्हणून मान वर करून त्यांच्याकडे न पाहतांच कोणी त्या चढूं पाहील तर 'घसरत्याचे विचार खोलांत' ह्याचा शारीरिक-मानसिक प्रत्यय त्या सहज आणून देतील. माणसाने आपली पायरी ओळखून वागावं आणि पायरी–पायरीनं उत्कर्ष करून घ्यावा असं त्या सांगत असतात.

ह्या पायऱ्यांच्या वरच्या टोकाला जेथे खडक संपला आहे, तेथे विनायकाचं देऊळ आहे. बाजूचा सारा खडक पांढरट– लालसर आणि हा विघ्नहर्ता मात्र काळा पाषाण आहे–अगदी काळचा कुळकुळीत शिसवीसारख्या दिसणाऱ्या दगडाचा आहे. त्याची मूर्ति साधीच पण सुबक आहे. त्याची बैठक अशा तोलाची आहे की, बसल्याजागी सर्व दृष्टीस पडावं अशा अविर्भावाची. एकदा वाटलं इतक्या उंचीवर हा मुद्दाम बसला असावा, कारण येथूनच त्रिचीवर येणारी विघ्नें दिसतील आणि तीं निवारतां येतील अशी त्याची कल्पना असावी, पण कोणत्याच विघ्नांचा प्रतिकार त्याने आजपर्यंत केला नव्हता, कारण तो तरी येथे त्या पळपुटचा पुरीसारखाच आला आहे. कारण बिभीषणानं तो लंकेला नेत असलेलं विमान ह्याला थोडा वेळ साभाळायला सांगितलं त्यावेळी हा एका तरुण पोराच्या रूपांत होता. जमिनीला विमान टेकायचं नाही अशी रामानें बिभीषणाला अट सांगितली होती– आणि टेकलें तर जमिनीपासून हललेंहि जाणार नव्हतें. त्याने तें विमान जमिनीवरच ठेवलें. मग वडाने जमीन घट्ट धरावी तशी त्या विमानानें जमीन घट्ट धरून ठेवली. एवढा शांत बिभीषण पण तोहि कातावला आणि ह्याला मारायला धावला. हा पळत सुटला तो येथे येऊन थांबला. तेव्हापासून येथेच राहिला. वरून आपली सृष्टिशोभा बघतोच आहे आणि उन्हापावसाचा मारा खातोच आहे...

येथल्या पायऱ्यांवर उभं राहावं आणि आजूबाजूला दृष्टि झोकून द्यावी. सारी त्रिची हिरव्यागार झाडींनं भरलेली आहे. लांबवर कावेरीवरचे दोन पूल दिसतात. एक रेल्वेचा पूल दुसरा खुष्कीचा. त्रिचीला एका बाजून कावेरीनं वेढलं आहे आणि दुसऱ्या बाजूने कोलरूनने त्या दोघींच्या मध्येच श्रीरंगम् वसला आहे. लांबवर पाण्यापलीकडे एक टेकडी दिसते– तिला सुवर्णाची टेकडी असं म्हणतात.


ह्या गणेशाच्या देवळाखाली एक शंकराचं मंदिर आहे, पण तें त्या दुपारीं बंद होतं. मध्येवरती एका गुहेत कुणा पल्लव राजाने खोदून घेतलेलीं अर्धवट शिल्पें आहेत– नाटकातलीं पात्रं अर्धवट रंगवून ठेवावीं तशीं. मी तसाच खाली उतरलों–उतरतां उतरतां पाहिलं–एका बाजूला एक रंगवलेला, सोनेरी झूल घातलेला हत्ती उभा होता आणि त्याचा माहूतहि–त्या माहुताला पैसे दिले की, तो हत्ती सलाम करीत होता. अशाच 'सलाम आलेकुम्' पद्धतीचं एक छोटं हत्तीचं पिलूं जंबुकेश्वराच्या मंदिरांतहि होतं...

कावेरीवरचा तो लांबलचक पूल ओलांडला आणि श्रीरंगम्‌च्या मंदिरांत गेलों. हें मंदीर प्रचंड आहे. त्यांत जायचं म्हणजे कमानी कमानींतून जावं लागतं. दर दोन कमानीच्या द्वारांत चांगलं शंभर–दोनशें पावलांचं अंतर असतं आणि ह्या अंतरांत दुकानं खेटून खेटून उभीं राहिलेलीं असतात. सर्व प्रकारचा बाजार तेथे भरलेला असतो. पितळेचीं भांडीं कापडचोपड ह्यासारख्या वस्तूंपासून दागिन्यांपर्यंत अनेक उलाढाली ह्या बाजारांत होत असतात.

–ॐ–

रॉक फोर्टच्या पायऱ्यांवर उभं राहावं आणि आजूबाजूला दृष्टि झोकून द्यावी. सारी त्रिचि हिरव्यागार झाडीनं भरलेली आहे.

–●–



गर्दी मी म्हणत असते आणि गंमत अशी की, हा बाजार श्रीरंगाच्या प्रांगणांतच वसलेला आहे. श्रीरंगाचें मंदीर घेराने ऐसपैस आहे— इतकं की, त्याचा हा घेर लक्षांत येत नाही. कावेरी – कोलारून नद्यांनी ज्या जमिनीच्या तुकडयाला कैचींत पकडलेलं आहे त्याच तुकडयावर हें मंदीर उभं राहिलं आहे. हया श्रीरंगाला १४ व्या शतकांत मुसलमानांच्या स्वारीच्या भीतीनं त्याच्या एका भक्तानं पळवून थेट तिरुपतीला नेलं होतं. आपल्याकडच्या विठोबाला कृष्णदेवरायानं विजयनगरांत देवळांत बसविण्यासाठी पंढरपूरपासून उचललं होतं पण त्यामागं भक्ति होती, भीति नव्हती. पुढे विजयनगरच्या काम्पण्णाच्या अमदानींत गोपण्णा म्हणून जिंजीचा सुभेदार होता. त्याने श्रीरंगाला पुन्हा तिरुचिरापल्लीला आणलं आणि हल्लीच्या ठिकाणीं त्याची प्रतिष्ठापना केली. वेरावळचा सोमनाथहि महंमद घोरीच्या भीतीनं दुसरीकडे भूमिगत झाला होता म्हणे. ही प्रतिष्ठापना झाल्यानंतर मात्र हा श्रीरंग 'काळाक्षिरीं' प्रतिपन्न होऊन बसला आहे– नव्हे शेषावर शय्या पसरून आडवा झोपला आहे. 'अनंतहस्तें स्वतःला लुटून घेणारी लक्ष्मी' त्याचे पाय चुरते आहे– शेष फणा उभारून सावली पाडतो आहे आणि पुजाऱ्याकडून तो चवऱ्या ढाळून घेतो आहे...

हया मंदिरांत शिरलं की, चक्रव्यूहांत अभिमन्यु सापडल्यानंतर त्याला कसं झालं असेल हयाची कल्पना बरोबर येते–तरी बरं त्याला आंत कसं शिरायचं हें तरी माहिती होतं आपण तर अगदी अनभिज्ञ असतों–नेमके जात आहों की नाहीं याची शंका पुन्हा पुन्हा भेडसावीत असते. मी तसाच आंत शिरलों आणि खांबाखांबागणिक उभा राहूं लागलों.

हया दक्षिणेंतल्या देवळांची रचना सर्वसामान्यपणें सारखीच असते. हया देवळांतून मुख्य दैवताबरोबर जसा इतर देवांनाहि मान दिला जातो तसा मुख्य दैवाताच्या वाहनाला देखील! लग्नघरीं वरपक्षाकडचा नोकरदेखील जसा रुबाब ठेवून असतो तशीं हीं वाहनें पण आपला रुबाब ठेऊन असतात. रामेश्वरीं जसा नंदी आहे तसा येथें गरुड आहे–त्याच्यावर नांवें लिहिलेला असा मंडपहि आहे–कारागिरीनें नटलेला. पंख उभारून पण हात जोडून उभी असलेली गरुडाची प्रतिमा गाभाऱ्यांत उभी आहे–त्यांच्या पायाखाली वन्य श्वापाद नाही तर असुर आहे आणि त्या श्वापदाला किंवा असुराला जरा वाकून पवित्रा घेऊन वरच्या स्वाराने भाल्याने आरपार टोचून टाकलें आहे लाच्या मांडवतल्या खांबावर अशींच शिल्पें आहेत–जणू एकच विशिष्ट क्षण–वीरश्रीचा सामर्थ्याचा क्षण त्या शिल्पकाराला गवसला होता आणि तो क्षण पुन:पुन्हा त्या खांबांवर तो जिवंत करीत होता–खेचून मागें आणीत होता. आणखी एक मांडव–हजार खांबाचा खांब खांब–खांबोल्या मनसोक्त खेळून घ्यावं.

हया गरुडाच्या मंडपाप्रमाणेच येथे एक अश्वमंडप आहे–त्यांच्यावर स्वार आरूढ झाले आहेत. मागच्या दोन पायांवर हे अश्व उभे राहिले आहेत आणि वरच्या स्वारांसकट आपला अवघा तोल नवरेबाजपणें सांभाळून आहेत. ज्या पायांवर ते उभे आहेत, त्यांत सामर्थ्याचा आविष्कार सहजीं प्रकटला आहे. जबडा क्वचित् वासलेला आहे तरी त्यांतहि रग दिसते आहे आणि डोळ्यांतहि वरच्या स्वारांच्या डोळ्यांतल्याप्रमाणे आवेश उतरला आहे. अमृतकुंभ लुटून आणणारा गरुड येथे अष्टसात्त्विक भावांनी नम्र झाला आहे...

( पृष्ठ २२ वर पहा )



( पृष्ठ १० वरून 'श्रीनगर' )

मैल २० मैल गेले. विशेष कांहीच रम्य वाटेना. ५०–६० मैलांवर जम्मू आलें. नंतर १०-२० मैलांवर उधमपूर आलें, आता मात्र निसर्गाचें रूप पालटूं लागलें. चढ सुरू झाला. गाडीचा गिइरचा आवाज मोठा येऊं लागला. थंड वारा येऊं लागला. पर्वतांच्या ओळी दिसूं लागल्या, ऊंच ऊंच वृक्ष दिसूं लागले, पहाडा पहाडांतून खळखळत जाणाऱ्या नद्यांना मागें टाकीत आमची बस आपला जीव सांभाळून रस्ता कापीत चालली होती. वटोट आलं. थंडी चांगलीच वाढू लागली ४-४॥ हजार फुटावर आम्ही होतों. डाक बंगल्यांतच जेवण घेऊन आम्ही झोपी गेलों.

शुक्रवार उजाडला. आज तें श्रीनगर दृष्टीस पडणार होतें, सकाळी ८ वाजतांच बस सुटली. एक एक प्रचंड पहाड मागें टाकीत हिला आपला मुक्काम गाठायचा होता. चढ चांगलाच जाणवूं लागला. वरवर जणुं स्वर्गात चाललों आहोंत कीं काय असें वाटत होतें. देवदार चीडचे वृक्ष जणु पहाडांशींच स्पर्धा करीत होते अगदी वेताची वाट. ती सुद्धा मध्येच एखाद्या खळाळत येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहानें मोड-कळीस आणलेली. खाली प्रचंड दरी त्यांत समोरून एखादी मोटर यावी, म्हणजे आपला जीव ड्रायव्हरच्या कौशल्यावर डोळे लावून बसे. हिल स्टेशनचे ड्रायव्हर मात्र खरोखरच वाकबगार असतात.

बनिहल पास ओलांडला आणि सरळ रस्ता सुरू झाला. वळणें संपलीं. सभोवार हिमशिखरें चमकूं लागलीं. ती सुप्रसिद्ध झेलम नदी दिसूं लागली. निसर्गश्रीनें नटलेल्या त्या नगरीनें रक्षण करण्याकरितांच जणू काय हारीनें उभे असलेले ते ऊंच ऊंच सफेदाचे वृक्ष ! एक मेकांना चिकटून डौलानें हलत होते. पुढे आणखी पुढे हिमशिखरें पुन्हा वृक्ष, इकडे तिकडे फुलं. मधेच नदी. वाट संपूंच नये, असच जात रहावं, असं वाटत होतं. काय अपूर्व दृश्य ! श्रीनगर म्हणजे जणूं निसर्ग सौंदर्याचा कळस. श्रीनगर म्हणजे जणू पंचपक्वान्नाचें ताट आणि तीं हिमशिखरें म्हणजे भोवतालची कलाकुसरी शुभ्र रांगोळी

त्या दैदीप्यामान नगरींत आमची बस शिरली "रिसेप्शन सेंटर" वर आम्ही उतरलों. "ट्रेडटूर" च्या एजंटनें "न्यू पॅलेस" हॉटेल-मध्यें आमच्यासाठी रिझर्वेशन केलें असल्याचें सांगितलें लगेच आम्ही तिकडे गेलों.

अगदी डाल लेकच्या समोर आमचें हॉटेल होतें. "व्ह्यू" फार सुन्दर होता. सभोवार बर्फाचे पर्वत, मध्ये डाल लेक. चहा वगैरे घेऊन जरा गांवांत चक्कर मारून आलों व पुढचे प्रोग्राम ठरवीत २-३ ब्लॅंकेटस प्रत्येकी घेऊन झोपीं गेलों.

शनिवार तारीख ७ रोजीं सकाळीं ८ च्या सुमारास झेलम नदीवरील सेव्हन ब्रिजेस खालून शिकाऱ्यांतून हिंडण्यास सुरुवात केली. अमिरा कदम पहिल्या पुलाखाली बसलों. अगदी सावकाश धक्का नाही. हिसका नाहीं. पोटांतलें पाणीसुद्धा हलत नाही. शिकारा एक एक पुल मागे टाकीत होता. रंगी बेरंगी नटवलेल्या त्या शिकाऱ्यांत अगदी पाय लांब करून आरामांत बसलों होतों. आजूबाजूला नदीच्या


र. नं. १४९० | विना सहकार नहि उद्धार | र. ता. १९-६-१९१७

सभासदांना कर्ज देणें, शेतकऱ्यांना खतें, पेंड व सल्फेट पुरविणें, शेतीला लागणारीं अवजारें, स्प्रे पंप्स् भाड्याने देणें याशिवाय शेतकऱ्याला नवें इंजिन, स्पेअर पार्टस् व त्यासाठी लागणारीं तेलें पुरविणारी 'अ' वर्गातील........

# देवळाली-प्रवरा विविध कार्यकारी सेवा सहकारी

## सोसायटी लि., देवळाली–प्रवरा, जि. अहमदनगर.

● सभासद संख्या ६७७ ● शेअर भांडवल ३,०२,५५५ ● रिझर्व व इतर फंड ७४,५४० ● सभासदांची ठेव १५,७२० ● इतर संस्थेंत गुंतविलेलें भांडवल १,७७,३०० ● खेळतें भांडवल २४,४७,७३६ ● सभासदांच्या उंसाचें क्षेत्र १३०० एकर ● सोसायटीच्या २७५ सभासदांनी 'राहुरी सहकारी साखर कारखान्या'चे शेअर्स घेतले आहेत.

– चेअरमन –
श्री. कोंडीराम पुंजाजी मुसमाडे

– मॅनेजर –
श्री. टी. डी. खोजे

– सेक्रेटरी –
श्री. एन. बी. परीट

कांहाजवळ लहान लहान बोटींतच रहाणारे कित्येक गरीब लोक दिसत होते. अंगात सदा गोधडीसारखं जाड मळके लांब कपडे, बायकांच्या कानांत खूप मोठ्या रींग्स, मध्येच किल्ल्याच्या जुडग्यासारख दागिने. कोणी जातांना दिसलें की पोर–पोरी हात हलवून कांही तरी बोलत. पोरी तर इतक्या सुंदर दिसत नाक-डोळे रेखीव, ओठ बारीक रंग गुलाबी. वाटलं की एखादी पोरगी उचलून न्यावी चांगले कपडे घालावे, नटवावी, थटवावी, मगळी नुसतीच बघत रहातील.

झलम नदीचें पाणी मात्र फार घाण. सगळीकडे कॅनॉल काढलेले. त्या पाण्यांतच गांवाचे सगळे व्यवहार चालत. कांही कांही ठिकाणी तर पाणी आटून चिखलांत बोटी रुतून बसलेल्या. नदींत घाण वाटली तरी महोरचें दृश्य मात्र मनोवेधक होतें. पांढऱ्या शुभ्र पर्वताची ओळच्या ओळ. गुलमर्गचा पर्वत हिरवे गार विपुल पर्णभार असलेले चिनार वृक्ष थंड हवा आणि सगळीकडे हिरवं गार ! मन अगदी प्रसन्न होतं.

ता. ८ रोजीं सकाळीं मोगल गार्डन्स पाहायला टूरिस्ट बसमधूनच गेलों. ८-१० मैलांवर शालीमार बाग.......थुय थुय उडणारीं लहान मोठीं कारंजींच कारंजीं. कारंज्याच्या दोन्ही बाजूस हिरव्या गार गवताच्या लॉनमध्ये व्यवस्थित लावलेले रंगीबेरंगी फुलांचे ताटवे. श्रीनगर हीच मुळी एक निसर्गाची बाग. आणि माणसाच्या हातांनी निटके रूप आणलेली ही आणखी एक बाग.

निशात बाग शालीमार बागेसारखीच पण ही अगदी डाल लेक समोर. गेल्याबरोबर एका उंच ठिकाणीं बसून दृश्य चांगलें बघतां यावें म्हणून एक गच्चीसारखी इमारतहि होती.

पायऱ्या चढत चढत थोडी थोडी वर वर दुतर्फा फुलझाडं. मधे कारंजी. नंतर चष्मेशाही, डोंगरांतून पडणारा हा मोठा पाण्याचा प्रवाह अडवून सगळ्या बागेंत खेळवून बाग केली आहे. पाणी पिण्यास मात्र फार छान आहे.

नंतर पहलगामला जायचं ठरलं. जातांना ८–१० मैलावर " कोकर नाग " दाखविले, एका मोठ्या डोंगरांतून ४–५ ठिकाणी मोक पाडून पाण्याचे पवाह जोरांत बाहेर येऊन वहात आहेत, पांढरे शुभ्र खळाळत, फेसाळत वहात आहेत. मागे पर्वतावर उंच उंच चीड वृक्ष. पायाखाली सगळीकडे हिरवगार गवत. फार छान ठिकाण आहे. पर्वतांतलं कुठलंहि अर्धं मांड मांड पाणी प्यायलं की, एकदम सगळा थकवा पार जातो.

नंतर ५–१० मैलांवर " अनंत नाग " दाखविले. विशेष कांही नव्हतं. एक मोठी पाण्याची टाकी. त्यांत पाणी पडत होतं. पुढे वहात होते. एक गंधकयुक्त पाण्याचा झरा जरा पलिकडे होता. नंतर "अच्छाबल" ला आलों. येथे आलों तों १२ वाजले होते. आम्हाला १२ वाजता पहलगामला गाडी पोचेल म्हणून सांगितलें होतें. आता ३ वाजता गाडी पोचणार म्हणून सांगू लागले, कुठे कांही खावयास नाहीं. एका ठिकाणी भाजी–भात देत होते. तो गार खरपुड्या भात आणि भाजी मिटक्या मारीत खाल्ली आणि थंड पाणी प्यालों.

नंतर मात्र आमची गाडी सरळ पहलगामला आली. स्टॅंडवर आमच्यासाठी डाक बंगला रिझर्व केला आहे असें एक माणूस सांगत आला. आग बाई बाई ! त्या बंगल्यांत पोचेपर्यंत जीव अगदी मेटा-



श्रीनगर हीच मुळी एक निसर्गाची बाग आणि माणसाच्या हातांनी निटकें रूप आणलेली ही आणखी एक बाग

कुटाला आला. स्टॅंडपासून खूप वर. टांगा, रिक्षा कांही वर जात नाही. खाली मोठया रस्त्यावर हॉटेलमधेच उतरलों असतों तर बरं झालं असतं असं वाटू लागलं.

**लीडरच्या सोबतीने केलेली रपेट**

बुधवार ता ११ ला सकाळी चंदवाडी पहायला ८ वाजतां निघालों घोडी केली. सवय नसल्यामुळे घोड्यावर बसून स्वतःच तोल सावरता सावरतां पंचाईत. त्यांत कांहीं ठिकाणी वाट अगदी खराब. खूप चढ. लीडर नदी मात्र सारखी शेजारून वहातांना दिसत होती. आम्ही वर वर चाललों होतों. तास दीडतास झाल्यावर एका झऱ्यावर पाणी पिण्यास उतरलों. मोठ्याने आवाज करीत. धडाधड उड्या घेत आपल्या बड्या कुळाची ऐट सांगत होती जणू ती नदी. निसर्गाच्या रिफ्रेजरेटरमधून वहात आलेलं तें पाणी एक मांडसुद्धा पिववेना. किती गार, किती ताजं ! पुन्हा घोड्यावर बसलों. अजून पुष्कळ वर जायचं होतं. ९०० फूट उंच. ४–५ मैल लांब. वरून उन चांगलंच चटकत होतं. हळू हळू निसर्ग–शोभा पहात अगदी जवळ आलों. नदीची साथ मात्र आम्हांला सारखी होती. इतका वेळ लांब लांब दिसणारा बर्फ आता आमच्या पायाशी आला. कित्येक ठिकाणीं बर्फाच्या मोठ्या थराखालून पाण्याचे प्रवाह वहात होते. झाडाखालून पुष्कळ ठिकाणी बर्फच बर्फ. जरा वरचा कचरा बाजूला करून खालचा लाडू करून घोडेवाले आम्हाला खायला देत होते.

शहरांतला मशीनचा बर्फ म्हणे टणक. एक आण्याचा आणला तरी वस्त्याने फोडल्याशिवाय लोटींत जाणार नाही. पण हा बर्फ अगदी निराळा. असंख्य हिमकण, थरावर थर, भुसभुशित, तेजःपुंज तोंडांत घातल्याबरोबर विरघळत.

चंदनवाडी आली, बर्फाचा पूल. दोन पहाडांतून नदी वाहात होती. वर बर्फाचा थरच्या थर. नदी एकदम खोल नव्हती. पुढे ती खोल झाली होती.७–८ टूरिस्ट लोकांसाठी 'वुडन हट्स्', २–३ चहाची हॉटेलं. झाली वाडी. आम्ही एका झाडाखाली बरोबर घेतलेली लंच पॅकेटस सोडलीं आणि उन्हांतच बसलों. सावलींत बसलों की हुडहुडीच भरायची. खाऊन पिऊन पुलाकडे निघालों. आमचा मुलगा आमच्या पुढे जो भराभर निघाला. तो एकदम पुलावर गेला अशी धडकी भरली म्हणता ! जर का बर्फ असाच भुसभुशीत असेल तर सरळ खाली नदींत तर नाही पडणार. 'अरे मागे फिर. मागे फिर' म्हणतो, पण त्याला कुठे ऐकू जात होतं ! शेवटी मागे पाहिलेन तेव्हा खुणेनी परतला. घटकाभर विसावा घेऊन हॉटेलांत चहा पिऊन परत आठ

मैल घोड्याची रपेट. दुसऱ्या दिवशीं असं आंग दुखलं ! 'अरू 'ला जायचं दुसऱ्या दिवशी ठरलेलं, पण कोणीच नांव काढीना 'अरूचं'. मग खाली गांवांतच हिंडलों, नदीवर बसलों. १२–१३ गुरुवार, शुक्रवार, पहलगामलाच राहिलों. आमचं 'अरू' राहिलं म्हणून जरा कंटाळवाणं झालं.

शनवारीं सकाळीं निघालों तों रिसेप्शन सेंटरवर १२ वाजतां आलों. रात्रीं तेथेच राहून रविवारीं सकाळीं गुलमर्गला गेलों. श्रीनगर पासून २४ मैल टंगमर्ग. रस्ता फार छान. समोर गुलमर्गचे डोंगर दिसतात. दुतर्फा सफेदा, चिनार. फारच रम्य वाटत होतं. १५–२० मैल गेल्यावर उजव्या हाताला जगांतला, उंचींत एव्हरेस्टच्या खालोखाल नंबर असलेला 'नंगा पर्वत' दिसूं लागला. २६ हजार फूट उंची असलेला तो पर्वत पाहून खूप आनंद वाटला. गेल्या-वर्षी नैनीतालहून पण असंच २२–२३ हजार फूटावरचें नंदादेवीचें शिखर पाहिलें होतें.

### फुलंच फुलं; लाल, गर्द निळीं


, आता मात्र चढ सुरू झाला. मोटार वर वर चालली. बरीच वर आली टंगमर्गला उतरलों, पुन्हा घोडी आली. मागल्यासारखीच हाडं खिळखिळीं होणार. पण ही वाट फार छान आहे. मोठी आहे. आमच्या मागे पुढें पुष्कळ लोक जात येत होते. वाटेने झरेबिरे कांही लागले नाहीत. ४ मैल केव्हा आलों कळलंच नाही. छोट्या छोट्या टेकड्यांनी घेरलेल्या एका मोठ्या हिरव्यागार ग्राउंडवर आलों. सगळीकडे फुलंच फुलं, लाल, गर्द निळी, झुबकेदार. झाडं वीतभरसुद्धा नाही. फुलांनी मात्र भरलेलीं. पृथ्वीवरच्या नंदनवनांतल्या फुलांच्या पायघड्या घोड्यांच्या पायाखाली तुडवल्या जात होत्या. माणसांच्या पायाखालीं तुडवल्या जात होत्या. कारण काय – फुलांशिवाय जागाच नाही !

ग्राऊंडवरून जरा वर गोल्फ हॉटेलमध्यें आम्ही उतरलों. १०-१०॥ वाजले होते. चहा-टोस्ट वगैरे घेतला आणि जेवण तयार करण्यास सांगून, स्वेटर, शाल, बूट, मोजे वगैरे घालून भटकण्यास बाहेर पडलों.

हॉटेलच्या बाहेर जागजागीं बर्फाचे थरच्या थर पडले होते, हॉटेलचा मॅनेजर म्हणाला, "२०–२५ दिवसांपूर्वी सरळीकडे बर्फच बर्फ होता. बर्फ फोडून हॉटेलची वाट चालू केली."

इतके दिवस आमच्यापासून फार लांब होता, पण तो आता आमच्या पायखालीं आला. मुठींत आला. तो अनोखा बर्फ, पाण्याचे ते जरा बदललेलं रूप. असंख्य चमकदार कणाकणांनी बनलेलं हें रूप मन अगदी वेडावून टाकतं. त्याच्यावर हात दाबला तरी गार लागत नाही. वर पाय देऊन चढाल तर खाली कुठे जाल याचा पत्ता लागणार नाही. जरा वरून पलीकडे जावं म्हणून चालूं लागलों तर एकदम गुडघ्यापर्यंत बर्फांत.



भाग्याची खूण ! भरघोस पिकासाठी भरपूर पाण्याचा प्रवाह सतत चालू ठेवण्याचें एकमेव साधन … …



विश्वास इंजिन

★ तगईवर मंजुर झालेलें ★

'विश्वास' आडवें इंजिन



'विश्वास' उभें इंजिन

इंजिनाचीं वैशिष्टयें :—

★ साधी व मजबूत बांधणी ★ सिंगल सिलिंडर ★ दोन फलाय व्हील्स्
★ कमी तेल खर्च ★ कोल्ड स्टार्ट ★ चार स्ट्रोक्स्.

उत्पादक

दि कोल्हापूर ऑटो वर्क्स, (म्हादबा मेस्त्री)

तार : KOPAUTO ] शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर. [ फोन नं. १८५

खूप इकडे तिकडे भटकलों. चिक्कार फुलं तोडलीं. समोरच तें वेडावून टाकणारं खिलमवर्ग दिसत होतं, २ मैलांवर बर्फाच्या पर्वतांत आजच्या दिवस विसावा घ्यावा, रात्रीं चांगली झोप काढावी व सकाळी ताजंतवानं होऊन दुसऱ्या दिवशीं निघावं असा बेत केला.

एक वाजतां जेवण घेतलं, नंतर पुन्हा इकडे तिकडे भटकलों. बर्फ फुलं, झाडं, नद्या किती पाहिलीं तरी हवीं हवींशींच वाटतात. सारखं खावं प्यावं भटकावं. पण आता सूर्य मावळूं लागला. इतका वेळ हवासा वाटणारा तो बर्फ, ती हवा आतां अंगाला झोंबूं लागली. लवकरच खोलींत जावून बसलों. प्रत्येक खोलींत एक बंब असतोच. तो पेटवायला सांगितला, बंबाचा धूर एका मोठ्या नळ्यांतून बाहेर काढला जातो व एका लहानशा उघड्या भोकांतून आंतल्या पेटलेल्या लाकडाची धग सगळ्या खोलींत पसरून खोली चांगली उबदार होते. एवढं होतं तरी प्रत्येकी तीन ब्लँकेटस् घेतलींच होतीं.

१० वाजतां डायनिंग हॉलमध्यें जेवावयास कसं जायचं ? खोलीच्या बाहेर पडलं की हुडहुडीच भरत होती. शेवटीं एकदा जाऊन जेवण घेऊन आलों. वाटेंत व्हरांड्यांत जरा पाय घोटाळले. समोरचं तें विलोभनीय दृश्य दृष्टीआड करण्यास डोळे तयार होईनात.

निळंशार आकाश, चम चम करणारे तारे, त्यांना पण तेज जास्त चढलं होतं की काय कोण जाणे ! तो मोठा हिमगिरी चंद्राच्या प्रकाशाने न्हाऊन निघाला होता. हो तेंच खिलनमर्ग ! तेंच अनेकांचं कुतूहलस्थान. असंख्य कोकिळा तेथें गात असतील. अनेक रंगीबेरंगी पक्षी इकडून तिकडे उडत असतील. झुळझुळ झरा वहात असेल. कैलास पर्वतावर वास करणारी शंकर–पार्वती कधी कधी तिथे विहार करीत असतील ! तिथून मानवाला आपण उंच झाल्याचा भास होत असेल. समोर, भोवताली असंख्य हिमशिखरें डोळे दिपवून टाकीत असतील तें दृश्य ! निघतांना मनांत, उराशीं बाळगलेली ती आशा अगदी थोड्याच तासांत सफल होणार !

## खिलनमर्ग, विरलेलं स्वप्न


खोलींत येऊन मोठ्या आनंदांत झोपीं गेलों. सकाळी लवकर उठून चहा घेऊन निघावं असा बेत केला, पण पहाट जाग आली तों काय ! बाहेर पावसाचा आवाज येत होता. खिडकींत जाऊन पाहिलं तर कांहीच दिसेना, झाडं नाहीत. पर्वत नाहीं, सगळीकडे धुकच धुकं, नशिबाला दोष देत सर्वजण एकमेकाकडे पहात राहिलों. खिलन मर्ग राहिला बाजूला. आता हा पाऊस आणि ही थंडी संपणार केव्हा आणि आम्हाला परत केव्हा जाऊं देणार याचीच काळजी वाटली. तिथले लोक म्हणाले कांही सांगतां येत नाही. कदाचित् आज थांबेल, कदाचित् ४–८ दिवस थांबणार नाही. २ तास झाले. ४ तास झाले, धुक्याचे लोटच्या लोट येतच होते, पाऊस पण पडतच होता. पाऊस मात्र घो, धो, नव्हता एवढं आमचं नशीब.

शेवटीं परत श्रीनगरला जायचं ठरवलं. कोट घातले. पांघरुणं अंगाभोंवती गुरफटून घेतलीं. कपडे ओले होऊं नयेत म्हणून काळजी घतली आणि निघालों.

मन अगदी खट्टू झालं होतं. खिलनमार्ग जे बघण्यासाठी आम्ही फार उत्सुक होतों. तें पार धुक्यांत विरून गेलं. पावसाने आणि धुक्याने नेमकी कशी वेळ साधली ! कालच जाऊन आलों असतों तर बरं झालं असतं ! अनेक विचार मनांत येत होते, वाटेने असा चिखल झाला होता ! आलों तीच वाट पण चोपट वाढली की काय असं वाटत होतं. पुढे टंगमर्गला धुकं, पाऊस कमी झाला. आम्हाला मोटार पण चटकन मिळाली. खिलनमर्ग नाहीतर नाही, पण धुक्याने खोलींत अडकवून टाकलं होतं ते तर सुटलों !

श्रीनगरला पण पाऊस होता. सोमवार ता. १६. अजून ४ दिवस परत जाण्यास अवकाश होता. २१ तारखेचीं आमचीं प्लेनचीं तिकिटें रीझर्व झालीं होतीं. शेवटचे ४ दिवस मात्र आम्ही कुठेच गेलों नाही. पाऊस थोडा होता. गुलमर्ग धुक्यांतच बुडालं होतं. श्रीनगर-मधेच भटकत होतों. सेंट्रल बझार, एम्पोरियम, रेसिडेन्सी रोडवरील दुकानांतून खरेदीच सुरू केली. शाली, कोट, साड्या, पर्सेस, गालीचे काश्मीरच्या म्हणून ज्या ज्या स्पेशल समजल्या जाणाऱ्या वस्तु त्या घेतल्या. ३ दिवस केव्हाच गेले. उद्या निघायचं म्हणून सहज एअर लाईन्सच्या ऑफिसमध्यें गेलों. तर कळलं की प्लेनचीं तिकीटं सर्व खपलीं असतील तर, प्रत्येकी ३० पौंडापेक्षा जास्त सामान जास्त पैसे देऊन पण नेतां येत नाही. संध्याकाळीं फिरण्याची तयारी करून बाहेर पडलेले आम्ही ही बातमी समजतांच घामाघूम (हवा.थंड असूनसुद्धां) झालों. कारण आमच्या जवळ १५० पौंड सामान होतें. मग राधा किसन सर्व्हिस तर्फे आमचे दोन जड वजनाचे डाग आदल्या दिवशींच मोटारीने पठाणकोटला पाठवून सामान आणि मनावरचें दडपण हलकें केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ ला विमान सुटणार होतं. आम्ही ८॥ ला विमान तळावर आलों. विमानतळ फारच छान जागीं आहे. सभोवताली सगळीकडे हिमपर्वत, मधेच मोठं ग्राउंड. पुष्कळ विमान जात-येत होतीं. सगळीकडे बाजूवाजूला खूप तऱ्हतऱ्हेचीं फुलझाडं लावलेलीं होतीं. सुवास खूप दरवळला होता.



वजन : ३७ पौंड

भविष्य : खोटें नाणें टाकल्यावर वजन खोटेंच येणार !

आम्ही आमचे विमान येण्याची वाट पहात होतों. आमचं विमान-पण १५-२० मिनीटं लेटच आलं. लगेच सर्व लोक विमानाच्या दिशेने गेले. विमानाचा आमचा पहिलाच प्रवास असल्यामुळें, आम्ही पण खूप उत्सुक होतों. विमान छोटं २५-३० उतारूंचं होतं.

**निरोप घेतां घेतां**

सर्व लोक आम्यावर बसले. विमानाची शिट्टी झाली. विमानानी ग्राऊंडवर चक्कर मारतां मारतां पृथ्वीचा संबंध तोडला. सर्व लोकांना कानांत घालण्यास कापूस, तोंडांत धरण्या चॉकलेटस् देण्यांत आली. कमरेभोवती पट्टे घट्ट करण्याची सूचना झाली, आम्ही वर वर जाऊं लागलों, इतके दिवस डोळे दिपवून टाकणारे ते प्रचंड पर्वत हळू हळू खालीं खालीं जात होते. मानवाच्या बुद्धीने त्यांच्यावर मात केली होती. आमचे विमान सरळ दक्षिणेकडे जात होतें. दोन्ही बाजूला बर्फाचे पर्वत, हिमालयाच्या रांगा फारच भव्य, उदात्त दिसत होत्या. बरा थोडा त्यांतच उंच दिसणारा नंगा पर्वत, पुराणांतल्या गोष्टीत शंकर पार्वती कैलासावर राहात होती तो कैलास, शुभ्र धवल, झाडं नाहीत, झुडपं नाहींत, नदी नाही सगळीकडे बर्फच बर्फ, लहान मोठ बर्फाचे पर्वत, तें नटकेचं दृश्य, तें स्वप्न मनांत किती साठवून घेऊं आणि किती नको असं झालं. क्षणाक्षणाला, प्रचंड भूप्रदेश नेत्राखालून जात होता. अफाट विश्वाचं रूप, त्यांत मानव किती कस्पटाएवढा मग त्याचे व्यक्तिगत हेवेदावे, आशा, लोभ या अफाट विश्वात कशालाच काय स्थान !

नद्या, रस्ते, पाटीवरच्या रेघेसारखा दिसत होत्या. जातांना २ दिवस चढत असलेला तो घाट-रस्ता अवघ्या एका तासांत संपला. विमान पठाणकोटला खालीं उतरलं. उजाड रुक्ष एक, ग्राऊंडवर आलं. आणि काय खरंच वाटेना किती उष्मा, किती गरमी, अक्षरशः चटके बसत होते. त्या थंड मनोहर इंद्रनगरींतून, ह्या मानव सृष्टींत आणून टाकल्याबद्दल विमानाचा आम्हाला अगदी राग आला.

नंतर आम्ही हरिद्वार, हृषीकेश, लक्ष्मणझुला वगैरे पाहून परतलों सगळ्या प्रवासांत आम्हांला कशाची उणीव भासली असेल तर ' कॅमेरा ' कॅमेरा होता, पण वापरतां येत नव्हता, नाहीतर ठीक-ठिकाणचे स्वत: काढलेले फोटो पाहून अत्तराच्या कुपीचें झाकण काढतांच सगळीकडे वास दरवळतो. तसा आमच्या असंख्य स्मृति उफाळल्या असत्या.

● ●


र.नं. १८४२०/ जय सहकार /र. ता. १०-२-१९५०

सभासदांना पिकावर कर्ज देणें, मिश्रखतें, पेण्ड व सल्फेट पुरविणें, शेतीसाठी अवजारें व स्प्रे पंप्स भाड्यानें देणारी ' अ ' वर्गीतील......

कोल्हार खुर्द विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.

कोल्हार खुर्द, जि. अहमदनगर

★ सभासदसंख्या २३७ ★ शेअर भांडवल ८६,६१५ ★ ★ सरकारी शेअर्स १०,००० ★ रिझर्व व इतर फंड १४७७२ ★ एकूण उलाढाल ५,१३,६२३

संचालक मंडळ

श्री. का. क. पाटील चेअरमन
श्री. कि. गं. पाटील व्हा. चेअरमन

– पंच –
श्री. का. स. घोगरे
श्री. मु. कि. पाटील
श्री. ल. बा. जाधव
श्री. रो. भा. शिरसाठ सेक्रेटरी

श्री. रा. आ. पवार अॅ. सेक्रेटरी
श्री. का. धों. गाढे सेल्समन
श्री. ठ. ल. शिरसाठ शिपाई



र.नं. २०६०४ ] जय सहकार [ र. ता. २५-१-१९५१

सभासदांना खतें, इंजिन ऑईल्स पुरविणें, माल तारणावर कर्ज देणें याशिवाय शेतकऱ्यांच्या मालांची विक्री करून देणारी ' अ ' वर्गीतील. . .

वांबोरी नूतन वि. का.

सेवा सहकारी सोसायटी लि.

वाम्बोरी, जि. अहमदनगर.

★ सभासदसंख्या २६५ ★ शेअर भांडवल १३,६९० ★ खेळतें भांडवल ८५,६४७ ★ एकूण उलाढाल ९,१२,९४२

सेक्रेटरी श्री. ह. तु. ताम्बे
चेअरमन श्री. ब. वि. पाटील

फोन] [नं. १८



*कापल्या गेलेल्या केकवरील अर्धवट अक्षरें जेम्सला दिसलीं. ' Happy Day ! ' अक्षरें वाचल्याबरोबर त्याला स्वत:चाच तिरस्कार वाटूं लागला.*

# रक्ताचें नातें

शरद चौधरी

जेम्स कॅरोनेल ! एक सहृदय बेकरीवाला. म्हणून, पणजीमधील सर्व लोक त्यास ओळखीत होते. जेम्स आपल्या पत्नीसह लिस्बनवरून जेव्हा आला तेव्हा त्याच्या-जवळ कांही फार पैसे नव्हते. परंतु आपल्या इमानदार व मनमिळाऊ स्वभावामुळे त्याने लवकरच स्वत:जवळ माया जोडली. जेम्स कॅरोनेल ४० वर्षांचा गोगपान, इवलीशी दाढी, कमावलेलें शरीर व पॅन्टचे खांद्यावरून घेतलेले पट्टे– त्याच्या पावाच्या दुकानांत येणाऱ्या लहान मुलांमुलींच्या बालीश लीलां-वरच समाधान मानत असे. कारण त्याच्या लग्नाला जवळपास १५ वर्षें होत आलीं होतीं परंतु संततीच्या बाबतींत तो दु:खीच होता.

त्याचें पावाचें दुकान होतें व्हिन्सेंट रोड-वर व दुकानच्या मागच्याच बाजूस तो राहत असे. व्हिन्सेंट रोडवर बहुतेक अधिकाऱ्यांचे बंगले जास्त. त्याच्या पावाच्या दुकानासमोरच श्री. देशपांडे नांवाचे एक महाराष्ट्रीयन पोलीस अधिकारी राहत होते. रश्मि ही श्री. देशपांड्यांची एकुलती एक सहा वर्षांची मुलगी मोठी गोड ! रोज सकाळ सायंकाळ ती जेम्स कॅरोनेलकडून पाव न्यावयाची जेम्स व रश्मिची मैत्री वाढली ती ह्यांतूनच. जेम्स-कडून पाव न्यावयाचा हा रश्मिच्या दिनचर्येतील एक भागच झाला. पाव घेण्यासाठी येण्यास रश्मिला एखादे दिवशीं उशीर झाला तर जेम्स स्वत: तिच्या घरीं पाव नेऊन द्यावयाचा. ह्यामुळे त्याची श्री. व श्रीमती देशपांडे यांच्याशींसुद्धा ओळख झाली जेम्स त्यांच्या घरीं आला म्हणजे हे दोघेहि पति-पत्नी मोठया आदराने त्याचें स्वागत करीत व रश्मीला तर जेम्सच्या दुकानांत दिवसां-तून २–४ वेळां गेल्याशिवाय करमत नसे. दुकानांत ती आली म्हणजे जेम्स तिला जबर-दस्तीने कांही खाण्यास देई व तिच्या बालिश प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत त्याला आनंद वाटे. मिसेस सिल्विया कॅरोनेल सुद्धा रश्मीवर मनापासून प्रेम करीत.

रश्मीमुळे दोन्ही घरचे संबंध सुरू झाले. जेम्सकडे झालेले पक्वान्न रश्मीसाठी म्हणून देशपांडे ह्यांच्याकडे जात असे व देशपांड्यां-कडे झालेलें पक्वान्न रश्मीच्या हस्तें कॅरोनेल दाम्पत्याकडे जात असे. सिल्विया संतती

अभावी दुःखी असे, परंतु रश्मीचें प्रेम व श्रीमती देशपांडे ह्यांची सहानुभूति त्यांना त्यांच्या दुःखाचा विसर पाडीत. गेल्या तीन वर्षांपासून रश्मीच्या वाढदिवसाकरतां जेम्स स्वतः आपल्या हाताने वळणदार अक्षरांत " Happy-Birth-Day " लिहलेला केक रश्मीला वाढदिवसानिमित्त बक्षीस म्हणून देत असे व श्रीमती कॅरोनेलकडून दुसरें एखादें सुन्दरसें बक्षीस तिला मिळत असे.

जेम्सच्या दुकानाच्या बाजूचा बंगला होता एका श्रीमंत व्यापाऱ्याचा...... श्री. कोरोविचचा ! कोरोविच सोन्याची चोरटी आयात निर्यात करून श्रीमंत झालेले होते. पीटर कोरोविच हा त्यांचा एकुलता एक तरुण मुलगा. पीटर दहा वर्षाचा असतांनाच त्याची आई मरण पावली व नंतर बापाकडून त्याला आईचें प्रेम मिळालें. त्यामुळे साहजिकच त्याचें आपल्या वडिलांवर अतिशय प्रेम होतें. अशा ह्या श्री. कोरोविचला देशपांडे यांनी एके दिवशीं मुद्देमालासकट पकडलें व त्याची तुरुंगांत १० वर्षांसाठी रवानगी केली. त्यामुळे पीटर कोरोविच देशपांड्यांचा फार तिरस्कार करीत असे.

पुढे पीटरने हिंदूंविरुद्ध कार्य करणारी एक संघटना स्थापन केली व जेम्स कॅरोनेलला या संघटनेचें सभासद करून घेण्यांत त्याला यशहि आलें. जेम्स कॅरोनेल संघटनेचा सभासद झाला. हिंदूंच्या कार्यक्रमांत पोर्तुगाल सरकारची परवानगी घेऊन हिंदूंनी केलेल्या समारंभांत– ह्या संघटनेचे सभासद गुप्तपणें अडथळे उत्पन्न करीत. जेम्सलासुद्धा त्यांत स्वतःच्या मनाविरुद्ध सहकार्य द्यावें लागत असे. कितीहि गुप्तपणें हे कट चालले होते तरी पोलिसांना त्याची माहिती कळलींच. पोर्तुगाल सरकारकडून देशपांडे यांची ह्या कामगिरीवर नेमणूक झाली व त्यांनी संघटनेंतील कित्येक सभासद पकडले, परंतु जेम्सला मात्र तो मुद्देमालासहित सापडला असतांना देखील पकडलें नाही. ह्य गोष्ट इतर स्वतंत्र व पकडल्या गेलेल्या सभासदांना फार लवकरच कळली. ते सर्व जेम्सचा उघड उघड तिरस्कार करूं लागले. त्याला फितुर म्हणून संबोधूं लागले. जेम्सला हें असह्य होत होतें. ह्या सर्व कारणांना देशपांडे कारणीभूत आहेत असें त्याला वाटूं लागलें. हळूहळू तो देशपांड्यांचा तिरस्कार करूं लागला. त्यांच्याशीं त्याने अबोलाहि धरला. परंतु रश्मी वरील त्याच्या प्रेमांत मात्र यत्किंचितहि बदल झाला नाही.

रश्मीचा वाढदिवस जवळ येत होता. जेम्स संघटनेतील कार्यांत व्यग्र होता, परंतु वेळांत वेळ काढून त्याने आपल्या लाडक्या रश्मीसाठी, रंगीत व वळणदार अक्षरांत " Happy-Birth-day " लिहिलेला एक सुंदरसा केक स्वतःच्या हाताने तयार केला व आपल्या पत्नीच्या हाताने वाढदिवसाचे दिवशी सकाळी पाठवूनसुद्धा दिला. कांही कामानिमित्त देशपांडे बाहेर गेले होते व लवकर येण्याची शक्यता नसल्यामुळे त्यांच्या गैरहजरींतच हा कार्यक्रम पार पडला.

संघटनेची सभा असल्यामुळे जेम्ससुद्धा त्या कार्यक्रमास गैरहजरच होता. संघटनेंतील बहुतेक सभासद तुरुंगांतच होते. सभेला फारच थोडे सभासद हजर होते. जमलेल्या सभासदांच्या चर्चेच्या शेवटीं श्रीं. देशपांडे यांना ठार करण्याचा त्यांचा निर्णय पक्का झाला, कारण त्यांच्या संघटनेची वाताहात श्री. देशपांडे यांनीच केली होती. पीटरा कोरोविचचा खाजगी सूड व इतर कांही कारणें समोर ठेवून हा कट पक्का झाला. जेम्स कॅरोनेल हें सर्व शून्य दृष्टीने पाहात होता. अखेर खून कुणी करायचा ह्यासाठी चिठ्ठ्या टाकण्यांत आल्या व दुर्दैवाने जेम्सच्या नांवाने चिठ्ठी निघाली. चिठ्ठी पाहातांच तो हतबुद्ध झाला. देशपांड्यांविषयी त्याच्या मनांत तिरस्कार जरूर होता, परंतु त्याच्या तिरस्काराची मजल खून करण्यापर्यंन्त गेली नव्हती. पण चिठ्ठी निघाली होती व हे सर्व विचार व्यर्थ आहेत हें जाणून तो पुढच्या तयारीस लागला.

दुपारीं पांचच्या सुमारास जेम्स आपल्या साथीदारांसह देशपांडे ह्यांच्या घरीं घुसला. प्रत्येकाजवळ पोलादी कांब होती. जेम्स घराला वळसा देऊन मागच्या बाजूस गेला. त्याचे साथीदार भयभीत चेहऱ्याने जेम्सच्या माग जात होते. बाजूच्या खिडकींतून सहज जेम्सन पाहिलें तों रश्मी आपल्या चिमुकल्या हातान, जम्सने केलेल्या केकचा तुकडा देशपांड्यांच्या तोंडांत मोठ्या लडिवाळपणें ठेवीत होती. बाजूच्याच टेबलावर केकची बशी होती व कापल्या गेलेल्या केकवरील अर्धवट अक्षरें जेम्सला दिसलीं. " Happy Day ! " अक्षरें वाचल्यावरोबर त्याला स्वतःचाच तिरस्कार वाटूं लागला. इतक्यांत रश्मीचे त्याच्याकडे लक्ष गेलें. दर वर्षीप्रमाणे ह्या वर्षी तिनें अजून स्वतःच्या हाताने जेम्सला केकचा तुकडा दिला नव्हता म्हणून ती केकचा तुकडा घेऊन धावतच बाहेर आली. तिने हसतच त्याच्या तोंडासमोर केकचा तुकडा धरला. जेम्स गांगरून गेला. त्याच्या मनःचक्षूंसमोर त्याच्यामुळे पोरकी...अनाथ होणारी रश्मि उभी राहिली. पोरक्या रश्मीचें चित्रदेखील त्याला सहन झालें नाहीं. व आज तोच तिला पोरकी...अनाथ करावयास निघाला


अहमदनगरमध्ये अग्रेसर

★ नयाघर लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग ★

प्रोप्राः– गंगाधर लोंढे P. S. V.

होता. त्याला स्वतःची व स्वतःच्या विचाराची लाज वाटू लागली.

त्याने मनाशी कांही निश्चय पक्का केला. हात पुढे करून उभी असलेल्या रश्मिच्या हातांतील केकचा तुकडा त्याने चटकन प्रेमाने खाल्ला व मागे वळून इतर साथीदारांना 'About-Turn' चा हुकूम दिला. त्याचा हा विचित्र हुकूम ऐकल्याबरोबर त्याचे साथीदार आश्चर्यचकित झाले. ठरविलेल्या कार्यक्रमांत बदल करावयास ते तयार नव्हते. ते परत फिरूं इच्छित नव्हते. जेम्स कॅरोनेल ह्या वेळीं त्यांचा नेता जरूर होता, परंतु नेत्याचा असला भेकड हुकूम मानावयास ते तयार नव्हते. ते पुढे पुढे सरसावत होते. देशपांडे बाहेर काय गडबड आहे हें पाहण्याकरितां दारांत आले व ५–७ लोक हातांत पोलादी कांबी घेऊन आपल्याकडे खुनशी नजरेने पाहात आहेत हें पाहिल्याबरोबर ते स्तंभीतच झाले. 'About Turn' चा हुकूम करड्या आवाजांत जेम्सच्या तोंडून पुन्हा एकवार बाहेर पडला. परंतु आता सर्वांचें रक्त तापलेलें होतें. मागे फिरण्याच्या मनःस्थितींत कोणीच नव्हता.

या गडबडींत देशपांडे चांगलेंच सावध झाले होते. पत्नीला त्यांनी पोलिसांना फोन करावयास सांगितलें व रश्मीला हाताशी धरून ते आंतल्या बाजूस पिस्तुल आणण्यासाठी धावलें.

'About Turn' चा हुकूम पुन्हां एकदा जेम्सच्या तोंडून बाहेर पडला. पण साथीदार आता कमालीचे बेभान झाले होते. एकाने आपल्याजवळची कांब एवढ्या जोराने जेम्सच्या डोक्यांत मारली, की भोवळ येऊन रक्ताच्या थारोळ्यांत त्याचा देह कोसळून पडला.

★ ★


र.नं. १०७९५ | जय सहकार | र. ता. १७-३-१९४७

सभासदांना तेलें, पेंड, खतें व कीटकनाशक द्रव्यें पुरविणारी 'अ' वर्गांतील. . . . .

**सोनई विविध कार्यकारी**

**सहकारी सोसायटी लि.**

**मु. पो. सोनई, ता. नेवासे, जि. नगर.**

– सेक्रेटरी – श्री. भा. य. भालेराव | – चेअरमन – श्री. ब. वि. लिपाने



फोन नंबर : ५ | विना सहकार नहि उद्धार | तारः– गंगासाकर

महाराष्ट्राचे भाग्यविधाते श्री. यशवन्तराव चव्हाण, श्रीमती इंदिरा गांधी व डॉ. केसकर यांनी प्रशंसिलेला, औद्योगिक सहकार आणि सामाजिक सहजीवन यांचा सुरेख संगम साधणारा...

**श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.**

**प्रगतीचा आढावा :—**

★ एक अल्कोहोल प्लँट व सुपरफॉस्फेट कारखान्याच्या रूपाने नव्या औद्योगिक क्षेत्रांत पाऊल.

★ १९६१-६२ च्या तिसऱ्या गळित हंगामांत कारखान्याने २३ २-१९६२ पर्यंत १। लाखाच्यावर साखर पोत्यांचें उत्पादन केलें आहे.

★ महाराष्ट्र, मद्रास, म्हैसूर व केरळ राज्यांतील प्रमुख बाजारपेठांतून कारखान्याच्या पांढऱ्या शुभ्र व दाणेदार साखरेस वाढती मागणी.

– व्हा. चेअरमन – श्री. म. वि. सुलतानपुरे | – चेअरमन – श्री. रत्नाप्पा कुंभार

( पृष्ठ १३ वरून तिरुचिरापल्ली)

भिडू कमी पडतील, पण खांब संपायचे नाहीत राज्य कुणावर हा प्रश्न मात्र उभा राहील...

श्रीरंग श्रीमंत आहे आणि तो ह्या श्रीमंतींत रंगतोहि. त्याचं सारं पंचायतन सुवर्णाचं आहे. गाभाऱ्यापुढे सुवर्णस्तंभ आहे. असाच सुवर्णस्तंभ मी वृंदावनांत लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत पाहिला होता...

ह्याने अनेक राजघराणीं नांदलेली पाहिलीं. चोल, पांड्य, होयसाळ आणि पुढें विजयनगरचें राज्य ह्यानी ह्या मंदिराची वास्तपुस्त करून त्याची वास्तु उभारिली.

हा श्रीरंग मी संध्याकाळी गेलों तेव्हां दडला होता. कितीएक बघ्यांची गर्दी तेथे जमली होती. दार लावलेलं होतं आणि तें उघडण्याची वेळ झाली नव्हती. प्राकारांत आणि मंडपांत लोक बसून राहिले होते.

तिनीसांजा झाल्या तेव्हां मंदिरांत शिरलों. निव्वळ त्याला पाहायला.लांबलचक रांग होती. त्या रांगेंत उभा राहिलों. सर्पाकृति वेटोळीं घेत घेत पसरलेली ती रांग अक्षय्य होती. पुढचे लोक जात होते आणि मागे तेवढेच येऊन मिसळत होते. हळूहळू मी पुढे सरकलों गाभाऱ्याच्याबरोबर समोर आलों तरी जवळजवळ पन्नास पावलावर गाभारा होता आणि येथूनच त्याला पाहयचं होतं. उकडून जीव हैराण झाला होता. पुजाऱ्यानं हातांत पणती घेतली आणि पणती उंच करून त्याने ती प्रचंड पाषाणाची मूर्ति दाखविली. लोकांच्या घोळक्यांत टाचा उंच करून आणि डोळे ताणून ती मूर्ति मी पाहूं लागलों. पण मी हतभागी. मला ती मूर्ति नीटपणें दिसलीच नाही. शेषाची फणा मात्र ओझरती दिसली आणि कांहींतरी निखाऱ्यासारखं रसरसलेलं. मला वाटतं ते शेषाचे डोळे असावेत...

श्रीरंग पाहाण्यास मी परत आलों, पण मधल्या वेळांत मी जंबुकेश्वराच्या देवळांत गलों. जंबुकेश्वराचं देऊळहि मोठंच आहे, पण श्रीरंगम्‌पेक्षा सुटसुटीत आहे, गबाळं नाहीं–सुबकपणांत जास्त गुण मिळवणारं आहे–येथें शिल्पकाराची छिन्नी अधिक कसोशीनं फिरली आहे. श्रीमंतीचा भपकारा येथे येणार नाही आणि जीव उबगणारहि नाही. येथें गोपूरं आहेत आणि प्राकारहि आहेत. ह्या प्राकारांच्या स्तंभांवर कोरलेल्या प्राण्यांची रेलचेल आहे. माना वेळावून मागे पाहाणारे बाकदार हंस आहेत. मेघांचा गडगडाट ऐकून पिसारा उभारून थयथय नाचणारे मोर आहेत. नृत्याच्या आविर्भावांत किंवा नृत्याची स्थिती घेऊन उभ्या राहिलेल्या प्रमाणबद्ध अवयवांच्या नर्तिका तर कितीतरी ! पण एका छोट्याशा शिल्पकृतीने मन खेचून घेतलं गेलं. त्या कृतीची उंची विशेष नव्हती–वीतभरच. एका वर्तुळांत एक नाग कोरला होता. त्याच्या शेपटीवर पाय रोवून उभा असलेला एक छोटा मुलगा होता. त्या नागाचं तोंड त्या मुलानं आपल्या हातांत घट्ट पकडून धरलं होतं आणि दुसऱ्या हातानं त्याची शेपटी खेचली होती. त्या सापाचा त्याने झोला केला होता. त्याची मान थोडीशी मागें कलली होती. मला रेवडी उडवणाऱ्या कन्हैय्याची एकदम आठवण झाली. गंमत अशी कीं हें विशिष्ट प्रकारचं शिल्प मला पुढे दक्षिणेंतल्या इतर देवळांतहि वारंवार आढळलं.

येथे शंकराला मुख्य दैवताचें स्थान–साहाजिकच त्याच्या निरनिराळ्या परी येथे आविष्कृत झाल्या आहेत. एक त्यांतलाच आविष्कार नटराजाचा

–त्या नटराजाच्या मंदिराच्या सभामंडपांत तेलंगी ब्राह्मणाची एक मूर्ति उभी आहे. माफक उंचीचा, सडपातळ, कमरेवरचा भाग उघडा, डोक्यावर पुढें क्षौर आणि मागच्या बाजूला शेंडीचाच अंबाडा बांधलेला असा तो भिक्षुक उजव्या हातांत तबक घेऊन उभा आहे...

ह्या जंबुकेश्वराचं माहात्म्य उमेमुळं वाढलं कारण जांभाच्या झाडाखाली तिने शिवलिंग पूजा करण्यासाठी ठेवलं. शंकरान तेथेच उमेला दर्शन दिलं म्हणून तो जंबुकेश्वर झाला...

ह्यालाहि मला नीट पाहातां आलंच नाही.

त्रिचीची शोकांतिका ही होती.–देवळांत जाऊन देव न दिसण्याची. वणवण तर दिवसभर झाली. पण पदरी ही खिन्नता मात्र आली. कांहींसा विमनस्क होऊनच मी स्टेशनवर परतलों. रात्री येणाऱ्या गाडीची वाट पाहूं लागलों–पुढे जाण्यासाठी !

★ ★

पक्क्या रंगाची मजबूत ५, ६, ८ व ९ वारी फॅन्सी पातळें, चादरी, पंचे व धोतरजोड्या उत्पादन करणारी. . . .

**श्री. दत्तात्रय हातमाग विणकर**

**उत्पादक सहकारी सोसायटी लि.**

**चितळे रोड, अहमदनगर**

किरकोळ विक्रीवर १ रुपयास ५ नये पैसे रिबेटची खास सवलत मिळेल.

**— पांढरे डाग —**

अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किं. ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

★ नकली वैद्यांपासून सावध राहावें ★

वैद्य– बी. आर. बोरकर

आयुर्वेद भुवन,

मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (महाराष्ट्र)

# सुंदर पत्रें ........................................ श्री. वा. काळे

३

१३, समर स्ट्रीट,
ऑबर्न, मॅसॅच्युसेट्स
१९ डिसेंबर १९६१

प्रिय मिसेस सुमन

क्लार्क विद्यापीठांतील दहा हिंदी विद्यार्थ्यांना आम्हीं गेल्या रविवारीं संध्याकाळीं फराळाला बोलाविले होतें. त्यांत तुझा पतीहि होता. त्याची ओळख झाल्याने आम्हांला विशेष आनंद वाटला.

तुमच्या देशांतल्या ह्या उत्साही तरुणांच्या सहवासांत आमचा वेळ फार मजेंत गेला. चार विद्यार्थी आणि एक विद्यार्थिनी, अशा चौघांनी मिळून हिंदी पद्धतीचे जिन्नस तयार केले होते. त्या सर्वांनी भारतांत स्वतःच्या घरीं सैंपाकघरांत प्रवेशहि केलेला नसेल, हें सांगायला नकोच! पण ते इथे मोठ्या उत्साहांत सैंपाक करायला तयार झाले; त्यांनी बनवलेले जिन्नस खरेखुरे हिंदी होते.

जेवणाला बहारीचा रंग आला. सगळेजण अगदी खुषींत होते; मिसेस ब्राऊनसुद्धा. सगळ्या विद्यार्थ्यांना आपले रोजचे अभ्यास विसरून घरगुती वातावरणांत घरगुती गप्पा मारायला मिळाल्या. सगळेजण एकाच कॉलेजांत शिकणारे; पण त्यांतल्या कांहींची एकमेकाची पहिली ओळख परवा, आमच्याकडेच, झाली!

त्या दिवशी मी काढलेले कांही फोटो तुला पाठवीत आहें. तुझा प्रियकर एप्रन बांधून बशा पुसत आहे, म्हणून गोंधळून जाऊं नकोस. त्याला आम्ही कांही फार बशा पुसायला लावल्या नाहीत; सगळं कांहीं गंमतींत चाललं होतं.

तुझा पति खरोखरच किती उमदा आहे! आम्ही आमच्या घरीं वारंवार बोलावूं; त्यालाहि यायला आवडेल अशी आम्हा दोघांचीहि खात्री आहे.


स्नेहांकित,
**हर्बर्ट ई. ब्राऊन**

**ता. क.**

आई-मुलाच्या आंतरिक प्रेमाचा आविष्कार करणारीं दोन पत्रें गेल्या अंकांत आम्ही वाचकांना सादर केलीं होतीं पण आज देत असलेल्या पत्रांत असें निकटचें नातें कोणतेंहि नाही. एकमेकांचे देश, भाषा, वेश भिन्न. एकमेकांची पूर्वीची ओळखहि पण नाही. तरीहि स्नेह व्यक्त करतांना किती अकृत्रिम जिव्हाळा या पत्रांत दिसून येतो पहा!

सुमनचा पति अमेरिकेंतील क्लार्क विद्यापीठांत उच्च शिक्षणासाठी गेला आहे. ऑबर्नच्या रोटरी क्लबाच्या अध्यक्षांनी त्या विद्यापीठांतील दहा विद्यार्थ्यांना फराळाला बोलाविलें होतें, त्यांत सुमनचा पतीहि होता.

आणि एका दिवस कल्पना नसतांनाहि सुमनच्या हातांत रोटरी क्लबच्या अध्यक्षांचें हें पत्र पडलें.



**उषा** ( सौ. देशपांडे ) आणि **श्रीधर** ( माधव वाटवे )

# ससा आणि कासव

*एक प्रदीर्घ परीक्षण*

पडदा वर जातो आणि रंगभूमीवर एका खोलींत मांडलेलें बिऱ्हाड दिसतें. एकूण सामानावरून या बिऱ्हाडाचा धनी गरीब असावा पण त्यांतल्यात्यांत व्यवस्थितपणाने रहाण्याची त्याची धडपड असावी याची कल्पना येते...आणि श्रीधर प्रवेश करतो. त्याला खूप आनंद झाला आहे. त्याच्या कमालीच्या सौम्या धीम्या प्रकृतीला मानवणार नाही इतका आनंद झाला आहे. सुदैवाने त्याच्या शेजारच्या बिऱ्हाडांतील तरुणी कुमुद हिच्याजवळ त्याला तो व्यक्त करायला मिळतो. संवादांतील पहिल्या कांहीं वाक्यांतच श्री. साठे यांनी श्रीधरची व्यक्तिरेखा ठसठशीतपणें उभी केली आहे. श्रीधर हा रेव्हेन्यू डिपार्टमेंटमधील एक कारकून असून नोकरींत कायम झाल्याने त्याला मोठा आनंद झाला आहे. नांवाच्या पाटीवर स्वतःच्या नांवापुढें आर. डी. हीं अक्षरें त्याने अभिमानाने लावलीं आहेत व पब्लिक हेल्थ डिपार्टमेंटमध्ये नोकरी करणाऱ्या कुमुदला नांवापुढे पी. एच्. डी. लावतां येईल या कल्पनेवर तो फारच खूष झाला आहे. कुमुद व श्रीधर अनेक वर्षे शेजारी रहात आहेत. आणि कायम झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्याने तिच्यासाठी साखरफुटाणे आणले आहेत. श्रीधरने पेढ्याऐवजी साखरफुटाणे आणणें, तुटपुंज्या पगाराच्या स्केलचा तपशील सांगणें, आपण परमनंट होण्याचा निश्चय केला होता व आज तो साध्य झाला. ही तुटपुंजी ध्येयपूर्ति अत्यंत गंभीरपणें सांगणे या सर्वांतून त्याच्या मनाची तोकडी झेप जाणवते. त्याची जीवनाचा मार्ग आक्रमण्याची कूर्म–गति स्पष्टपणें लक्षांत येते आणि तरीहि त्याच्या सरळपणामुळे, भाबडेपणामुळे व कुमुदकडून नांवाच्या पाटीवर हळदीकुंकू वाहून घेण्याच्या भावुकपणामुळे प्रेक्षकांना त्याच्याबद्दल स्नेह वाटूं लागतो. कुमुदच्या व श्रीधरच्या स्नेहाचें नक्की स्वरूप काय असावें यासंबंधी कुतूहल जागृत होतें आणि इतक्यांत कुमुद जाते व तिचे आईवडील श्रीधरच्या खोलींत येतात. कुमुदचे वडील नाना हे भयंकर संतापले आहेत. संतापाने ते इकडे तिकडे फेऱ्या मारतात, मधून मधून बायकोवर खेकसून पाणी मागतात आणि श्रीधरला मुकुंदने–त्याच्या मित्राने–चार दिवसाच्या आंत त्याच्या खोलींतून गेलें पाहिजे असें निक्षून बजावतात. नाना हे ऑफिसांत हेडक्लार्क अगर सुपरिंटेंडेंट असावेत व हाताखालच्या कारकुनांवर कडक हुकमत गाजविण्यांत त्यांचा पराक्रम क्षणोक्षणीं व्यक्त होत असावा हें त्यांच्या बोलण्यावरून आणि वागण्यावरून चटकन् लक्षांत येतें. मुकुंदा नळावर गाणीं म्हणत अंघोळ करतो. अंघोळ करतांना पाणी उडवतो. या उच्छृंखलपणामुळे परंपराभिमानी नानांना भयंकर राग आलेला आहे. या संवादांतून मुकुंदसंबंधी एकदम कुतूहल निर्माण होतें; मात्र ही एक प्रातिनिधिक (Typical) व्यक्ति आहे हें लक्षांत येतें. नानांचें पाणी मागणें हें कांहींसें नाटकी वाटतें. त्यांच्या अनुनासिक स्तोत्रपठणाच्या त्यांच्या बायकोने केलेल्या त्याच्या वर्णनावरून संस्कृतिनिष्ठेचा पोकळपणा सूचित होतो.

मुकुंदा येतो आणि नाना व त्यांची पत्नी निघून जातात. मुकुंदाची बेफिकिर वृत्ति, त्याचें शीळ वाजविणें, बेछूट बोलणें या सर्वांतून श्रीधर व मुकुंद हीं दोन टोकें आहेत हें नाटककाराने रेखिवपणाने, दाखविलें आहे. श्रीधर त्याला आपल्या आयुष्यांतील महत्त्वाची घटना– नोकरींत कायम होणें– वर्णन करून सांगतो. पण बेकार असूनहि मुकुंदला त्या गोष्टीचें मुळीच महत्त्व वाटत नाही. श्रीधरच्या खोलीची, तिथल्या पडलेल्या गिलाव्याची तो हेटाळणी करतो, श्रीधरच्या आनंदाचीहि तो उपेक्षा करतो. मात्र हें करण्यांत आढ्यता अगर तुच्छता दिसत नाही. मुकुंदाच्या बेफिकिर, स्वैर मनाला श्रीधरचें बंदिस्त, कुंपण घातलेलें जीवन नीरस रुक्ष, वाटतें. श्रीधरचें संथ लयींतील जीवन आणि मुकुंदाचें गडबडे अवखळ जीवन यांतील विरोध फारच प्रभावीपणाने व्यक्त झालेल आहे. नोकरी मागावयाची असतांना टॅक्सींतून जाऊन व व्हिजिटिंग कार्ड पाठवून आपण एकदम नानांसमोर कसे उभे राहिलों, नानांचा

आपण लहानपणासून ज्या तात्पर्य असलेल्या गोष्टी वाचतों त्या जीवनांत अनेकदा खोट्या ठरलेल्या आढळून येतात. सॉमरसेट मॉमने हीच कल्पना रंगविली आहे. श्री. अनंत काणेकर 'दिव्यावरती अंधार' या कथासंग्रहांतील कथांचा आधार हीच कल्पना आहे. श्री. शं. गो. साठे यांनी लिहिलेलें हें नाटक हा या कल्पनेचा अत्यंत प्रभावी आविष्कार आहे. कासवाला सशाची झेप येणारच नाही हें कटु सत्य अत्यंत हळुवारपणें त्यांनी व्यक्त केलें आहे.

ले. :– ग. प्र. प्रधान

संताप अनावर कसा झाला याचें मुकुंदा मोठें सुरस वर्णन करतो व या त्याच्या वर्णनाच्या ओघांत श्रीधरचा 'परमनंट' झाल्याबद्दलचा आनंद केव्हाच वाहून जातो. मुकुंद बादली वाजवीत अंघोळीला जातो. अधिकाराच्या धुंदींत अष्टौप्रहर वावरणारे नाना व नुकताच कायम झालेला श्रीधर या कारकुनी जगतांतील दोन व्यक्तिरेखा मांडल्यावर नाटककारानं त्रिंबकराव ही खास प्रातिनिधिक व्यक्ति रंगभूमीवर आणली आहे. नानांच्या हाताखाली नोकरी करणाऱ्या त्रिंबकरावांना नानांचा सासुरवास वर्षानुवर्षं सहन करावा लागला आहे. रोज अपमान गिळण्याची त्यांना संवय आहे व त्यामुळे सूडानें धुमसणारें त्यांचें मन नानांचा अपमान करणाऱ्या कोणावरहि निहायत खूष होतें. त्रिंबकराव श्रीधरकडे येऊन मुकुंदानें नानांची कशी जिरवली याचें रसभरित वर्णन करतात. इतक्यांत कपडे भिजलेले नाना संतापानें येतात आणि त्यावरून मुकुंदाची साग्रसंगीत अंघोळ कशी चालली आहे तें समजतें. नानांनी त्रिंबकरावांना "कां हासतां?" म्हणून दरडावून विचारणें आणि "दांत पडल्यामुळे मी हसल्यासारखा दिसतों." हें त्रिंबकरावांचें उत्तर यामधून वरिष्ठ–कनिष्ठ संबंध मोठ्या बहारीनें व्यक्त होतात. मुकुंदावर खूष असलेले त्रिंबकराव, आपल्या बायकोची भाची उषा ही लग्नाची आहे असें सांगतात. श्रीधर कांहीसा खुलतो आणि तितक्यांत त्रिंबकराव व त्यांच्या पत्नी त्याला उषा मुकुंदाला दाखवायची आहे असें सांगतात. हा दाखवण्याचा समारंभ श्रीधरच्या खोलींत करावयाचा. त्या दोघांना बोलत बसवून श्रीधरनें लांब फिरून यावयाचें, हा सारा तपशील ठरवून त्रिंबकराव जातात. मुकुंद अंघोळ करून येतो. नानांचे कपडे भिजले, ते चिडले यामुळे तो स्वतःवर खूष असतो. श्रीधरच्या अवघडलेल्या मनाला हें पसंत नाही, पण तरीहि मुकुंदाला स्पष्टपणें कांही सांगण्याचा धीर होत नाही. ससा आणि कासव यांच्या गतींतला फरक पुन्हा तीव्रतेनें जाणवतो आणि पहिला अंक संपतो. पहिल्या अंकांत संभाषणांतून आणि लहान-सहान कृतींतून सर्व प्रमुख व्यक्तींची ओळख होते. श्रीधर आणि मुकुंद यांच्या स्वभावांतील विरोधांतून नाट्य उभें रहातें. नाटकाच्या पुढील उभारणींत कुमुद, नाना, त्रिंबकराव आणि उषा यांचा नाटककार कसा समावेश करून घेईल आणि कथावस्तूची घडण कशी होईल यासंबंधी प्रेक्षकांच्या मनांत उत्सुकता निर्माण होते.

दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीस मुकुंद आणि कुमुद यांच्या प्रेमाची कल्पना येते. मुकुंद आणि कुमुद एकमेकाला गुप्तपणें भेटत, फिरावयास जात, सिनेमाला जात, हें सारें समजतें. कुमुद या प्रेमाचें पर्यवसान लग्नांत होईल अशी अपेक्षा करीत असते, पण मुकुंद मात्र तिला बेफिकिरीनें लग्न करणार नाहीं म्हणून सांगतो. नंतर कुमुद जाते आणि श्रीधर प्रवेश करतो. श्रीधर व मुकुंद यांच्यांतील संवाद फारच सुंदर आहेत. श्रीधर सांगतो, "आता माझा (Out look) बदलत चालला आहे," आणि भाबडेपणानें आपल्या मनांतील स्वप्न वर्णन करतो. मुकुंद त्याची थट्टाच करीत असतो. या संवादांत श्रीधरनें केलेला कुमुदचा सूचक उल्लेख मुकुंदाच्या लक्षांतहि येत नाही. श्रीधरच्या मनांत कोणत्या अपेक्षा निर्माण होत आहेत. व कुमुदच्या बाबतींत त्याचा कसा अपेक्षाभंग होणार, हें मनाला जाणवून आपल्याला त्याच्याबद्दल सहानुभूति वाटते. श्रीधर मुकुंदाला उषा तेथे येणार आहे हें सांगतो, पण ती श्रीधरलाच सांगून आली आहे असा मुकुंदचा गैरसमज होतो.

मुकुंद गेल्यावर त्रिंबकराव व त्यांच्या पत्नी येतात आणि श्रीधरच्या खोलीचा ताबा घेतात. त्याच्या सामानाची त्यांनी केलेली हालवाहलव व नवी मांडणी या सर्वांतील तपशिलावरून दिग्दर्शनाचें कौशल्य किती अव्वल दर्जाचें आहे तें लक्षांत येतें. उषा येते व तिचा कांही वेळ श्रीधर हाच मुकुंद आहे असा गैरसमज होतो, पण श्रीधर तो दूर करतो व्ह. फा. झालेल्या या मुलीला अनेकांनी नकार दिलेला असतो. तिला श्रीधरच्या मनाचा मोठेपणा कळून येतो व त्याच्याबद्दल एकदम आदर वाटतो. नंतर दुसऱ्या अंकाचा सबंध भाग गैरसमजावर उभारलेला आहे. श्रीधर निघून गेल्यावर मुकुंदाला कुमुद भेटावयास येते व त्याच वेळीं उषाहि येते. मुकुंदाची समजूत ती श्रीधरची वाग्दत्त वधू आहे, व त्यामुळे तो जें बोलतो त्यावरून उषाच्या मनांत होकार मिळणार अशी अपेक्षा निर्माण होते. कुमुद व मुकुंद यांना ही ब्याद केव्हां जाते असें झालेलें असतें. त्या दोघांनी उषाची चालवलेली फसवणूक, मुकुंदाच्या हातांत आंगठी घालून कुमुदनें लग्नाचें त्याच्या-

**पहिल्या अंकांत श्रीधरच्या व्यक्तिरेखेनें आपल्या मनाची पकड घेतलेली असते व नाटयाचा तो जेव्हा केंद्रबिंदु असतो तेव्हा नाटक रंगतें. परंतु दुसऱ्या अंकांतील थोडीशी सुरुवात सोडल्यास श्रीधर मागे सरकतो. मुकुंदाच्या जीवनांतील घटनांना प्राधान्य येतें व प्रेक्षकाला नाटक विस्कळित होत चाललें आहे असें वाटतें.**

कडून मिळविलेलें अभिवचन, गैरसमजामुळे संवादांत निर्माण झालेली पताकास्थानें या सर्वांतून थोडीबहुत करमणूक होत असली तरी त्यांतून नाटक रंगत नाही. 'कझिनबाई,' 'शहासाहेब' हा विनोद अगदीच पोरकट वाटतो. उषा कडू चहा करते व तो चहा घेऊन हैराण झालेल्या मनःस्थितींत मुकंदा कुमुदशीं लग्न करण्यास तयार होतो हेंहि उथळपणाचें वाटतें. नंतर येतो श्रीधर व मुकुंदाला उपासंबंधी अभिप्राय विचारतो. गैरसमजामुळे मुकुंदा अनुकूल मत व्यक्त करून श्रीधरला Go Ahead असा आदेश देतो. अंकाच्या शेवटी त्रिंबकराव येतात. त्यांनी सिनेमाचें तिकिट काढूनहि सिनेमा त्यांना पहावयास मिळालेला नसतो, कारण नानांनी त्यांना आंगठी शोधण्याचा हुकूम दिलेला असतो. कुमुदने मुकुंदाला दिलेल्या आंगठीचें रहस्य उलगडतें व अंक संपतो. पहिल्या अंकाच्या मानाने हा अंक निराशाजक वाटतो. गैरसमजांतून निर्माण होणारें नाट्य फारसें हृद्य वाटत नाही. पहिल्या अंकांत श्रीधरच्या व्यक्तिरेखेनें आपल्या मनाची पकड घेतलेली असते व नाटयाचा तो जेव्हा केंद्रबिन्दु असतो तेव्हा नाटक रंगतें, परंतु या अंकांतील थोडीशी सुरुवात सोडल्यास श्रीधर मागे सरकतो; मुकुंदाच्या जीवनांतील घटनांना प्राधान्य येतें व प्रेक्षकाला नाटक विस्कळित होत चाललें आहे असें वाटतें.

तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीस श्रीधर खोलींत असतांना कुमुद येते. श्रीधरच्या मनांतील अपेक्षा आता वाढल्या आहेत. तो कुमुदशी सूचकतेनें बोलतो. ती त्याला 'मुकुंदाने तुम्हाला सांगितलें का? म्हणून विचारते. श्रीधरच्या उत्तरावरून त्याला आपलें प्रेमप्रकरण माहीत आहे असा समज होऊन त्याला नानांची समजूत घाला असें विनविते व तो उल्हसितपणें तें करण्याचें अभिवचन देतो. ती जाते व संतापलेले नाना व त्यांच्या पत्नी श्रीधरच्या खोलींत येतात. कुमुद मुकुंदबरोबर पळून गेल्यामुळे त्यांचा संताप पराकोटीला गेलेला असतो.

आपली प्रतिष्ठा धुळीला मिळाली, परंपरा नष्ट झाली या सर्वामुळे नाना क्रोधाविष्ट झाले आहेत. बिचाऱ्या श्रीधरला मात्र वाटतें की, कुमुद आपल्याशी लग्न करणार म्हणून ते रागवले आहेत. गैरसमजावर आधारलेला हा संवाद कांही वेळ चालतो आणि पोलिसांत वर्दी द्यावयास हवी हें कुमुदची आई म्हणते व त्यांच्या स्पष्ट बोलण्यावरून श्रीधरला कठोर सत्यस्थितीची एकदम कल्पना येते. मुकुंद व कुमुद पळून गेलीं आहेत या बातमीच्या धक्क्यानें तो एकदम गप्प होतो. त्याच्या स्वप्नसृष्टींतील बंगला एकदम ढासळतो आपण कासव आहोत हें त्याला जाणवतें आणि त्याचें समजूतदार मन अंग चोरून परिस्थितीचा हा आघात सोशिकपणानें स्वीकारतें. मुकुंद व कुमुद येतात आणि एकदम उत्साहाचें वातावरण निर्माण होतें. कुमुदची आई त्याचें कौतुक करण्याच्या मनःस्थितींत असते. परंपराभिमानी नाना या गोष्टीचा प्रतिकार करण्यांतच अब्रूचे धिंडवडे होतील अशी स्वतःची समजूत करून घेऊन, वरवर दात–ओठ खात संमति देऊन आपल्या बिऱ्हाडाकडे जातात. श्रीधर यांत दुखावला गेला आहे याची कोणाला जाणीवहि नसते. मुकुंद व कुमुद याच्या लग्नाच्या मार्गांत 'जागा नाही' एवढीच केवळ अडचण असते. ती सोडविण्यासाठी नाना त्रिंबकरावांना हुकुम सोडतात. नंतर उषा येते. श्रीधरच्या मनाला पुन्हा पालवी फुटते. मुकुंदाचा नकार ऐकल्यावर उषाला अतिशय वाईट वाटतें. श्रीधर तिची समजूत घालतो व प्रेमयाचना करतो. पण उषा त्याची मागणी झिडकारते. आपलें मन मुकुंदावर बसलें होतें व त्याचा होकार मिळाला असें समजून आपण त्याच्याकडे पहात होतें हें सांगून ती श्रीधरला म्हणते, मला तुमच्याबद्दल आदर वाटतो." त्याचा मोठेपणा तिला जाणवलेला असतो, पण प्रियकर म्हणून ती त्याच्याकडे पाहूं शकत नाही. श्रीधर हा अपमनाहि गिळतो. "उषा मीं तुमच्या साठीं दुसरें काय करूं?" असें विचारते. त्या वेळी तिच्या वडिलांच्या मालकीची माळयावरील टॅक्सीस्टॅन्डसमोरची जागा मागतो. आपण तेथे राहावयाला जायचें व मुकुंदाला आपली खोली द्यावयाची असा श्रीधरचा विचार असतो. आपलें उपेक्षित जीवन दूर कोपऱ्यांत जगावें असें त्याला वाटतें. असें करतांना मित्राला सहाय्य करण्यांतच उदात्तता आहे अशी त्याची धारणा असते. तो पहिल्या अंकाच्या सुरूवातीस लावलेली पाटी काढतो, पण त्याला हें त्यागाचें समाधानहि लाभत नाही. मुकुंद त्या खोलींत राहाण्याची कल्पना उडवून लावतो व श्रीधरला आपला त्यागहि थिटा आहे; जगाच्या बाजारांत त्याला किंमत नाहीं ही कटु जाणीव होते. मुकुंद त्याला आणखी एक चांगली मिळत असलेली नोकरी आपण कशी नाकारली तें सांगतो. श्रीधर त्या पगाराचा मोठेपणा व तो झिडकरण्यांतली मुकुंदाची बेफिकिरी समजूं शकत नाही. त्याला गवसलेला जीवनाचा अर्थ हरपलेला असतो व तो हताशपणें पलंगावर बसला असतांना पडदा पडतो.

तिसरा अंक बहारीचा वाटतो. दुसऱ्या अंकांत लेखक विनोद निर्मितीच्या मोहाला बळी पडणार की काय अशी भीति वाटते. तिसऱ्या अंकाची सुरुवातहि गैरसमजावर आधारलेली आहे, पण कुमुद मुकुंदबरोबर पळून गेल्याची बातमी समजल्यावर श्रीधरच्या मनांतील गोड गैरसमज क्षणांत विरघळतो आणि सत्यस्थितीच्या

**आपली राहण्याची खोली मित्राला देऊन स्वतः पोटमाळ्यावर रहावयाला जाणें हा त्याग आहे, पण त्या त्यागालाहि भव्यता प्राप्त होत नाही. किंबहुना मुकुंदाला त्या खोलींत रहाण्याची कल्पनाहि असह्य वाटत आसल्यामुळे हा त्याग खुरटा भासतो. श्रीधरच्या जीवनांतील उदात्त क्षण परिस्थितीमुळें क्षुद्र असतात ही त्याच्या जीवनाची शोककथा आहे आणि नाटककाराने अत्यंत सूचकतेने ती रंगविली आहे.**


कठोर आघाताने तो सुन्न होतो. उषा त्याची मागणी झिडकारते हीं कटु सत्याची श्रीधरला झालेली दुसरी जाणीव. आणि तो आपली खोली मुकुंदाला द्यायला तयार असतो, पण त्याचें हें औदार्य मुकुंदाच्या खिजगणतींतहि नसतें हें विदारक वास्तवाचें त्याला झालेलें तिसरें भयानक दर्शन ! पहिल्या अंकाच्या सुरुवातीस नोकरींत कायम झाल्यामुळे श्रीधरला आपला रथ जमिनीपासून चार बोटें वर चालल्यासारखा वाटतो, कुमुद आपल्या जीवनांत प्रवेश करणार या कल्पनेने या रथाचे घोडे बेफाम धावूं लागतात, पण तिसऱ्या अंकांत ही गति एकदम थांबते. रथांत बसणें आपल्याला झेपणारें नाही हें समजून येऊन श्रीधर पुन्हा धीमेपणाने जीवनाचा रखडणारा प्रवास सुरू करतो. तिसऱ्या अंकांत श्रीधरचा मनोभंग श्री साठे यांनी अत्यंत नाट्यपूर्ण रीतीने दाखविला आहे. त्याच्या अपयशाची अपरिहार्यता जाणवते आणि तरीहि त्याच्या विषयीच्या सहानुभूतीने मन कांठोकांठ भरून येतें.

आपण लहानपणापासून ज्या तात्पर्य असलेल्या गोष्टी वाचतों त्या जीवनांत अनेकदा खोट्या ठरलेल्या आढळून येतात. सॉमरसेट मॉमनें हीच कल्पना रंगविली आहे. श्री. अनंत काणेकरांच्या 'दिव्यावरती अंधार' या कथासंग्रहांतील कथांचा आधार हीच कल्पना आहे. श्री. शं. गो. साठे यांनी लिहिलेलें हें नाटक हा या कल्पनेचा अत्यंत प्रभावी आविष्कार आहे. कासवाला सशाची झेप येणारच नाही हें कटु सत्य अत्यंत हळुवारपणें त्यांनी व्यक्त केलें आहे. या नाटकांत श्रीधरची गति कासवाची आहे; मात्र त्याने आपलें आयुष्य कांही तत्त्वाप्रमाणे जगावयाचें ठरविलें आहे. परंतु त्याच्या एकूण जीवनाची उभारी कमी असल्यामुळे या तत्त्वांना यांत्रिक नियमाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. आपली रहाण्याची खोली मित्राला देऊन स्वतः पोटमाळ्यावर राहावयाला जाणें हा त्याग आहे, पण त्या त्यागालाहि भव्यता प्राप्त होत नाही. किंबहुना मुकुंदाला त्या खोलींत राहण्याची कल्पनाहि असह्य वाटत असल्यामुळे हा त्यागहि खुरटा भासतो. श्रीधरच्या जीवनांतील उदात्त क्षण परिस्थितीमुळे क्षुद्र बनतात ही त्याच्या जीवनाची शोककथा आहे आणि नाटककाराने अत्यंत सूचकतेने तीं रंगविली आहे. दुसऱ्या अंकांत श्रीधर आपलें जागेसंबंधीचें स्वप्न मुकुंदाला सांगतो आणि तिसऱ्या अंकांत नव्या जागेचें वर्णन करतांना त्याच गोष्टी थोड्या बदलून सांगतो. मुकुंद त्याला पूर्वीची आठवण करून म्हणतो. "आणि घरासमोर एक गाडी" यावर श्रीधर टॅक्सीस्टँडची आठवण होऊन म्हणतो, "एकच कां चार-पांच गाड्या!" या त्याच्या उद्गारांतील कारुण्य जितकें हृदयस्पर्शी आहे, तितकेंच तें मुकुंदाच्या लक्षांतहि येणार नाही हा दैवदुर्विलास अस्वस्थ करणारा आहे.

या नाटकाचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे एक अतिशय गंभीर समस्या श्री. साठे यांनी आपल्या विनोदगर्भ शैलीमुळे अतिशय रंजकतेने मांडली आहे. एक-दोन ठिकाणें सोडल्यास या नाटकांतील सर्व विनोद अत्यंत सहज व निर्मळ आहेत. कलावंताचें चिंतनशील मन या विनोदाच्या मागे दडलेलें आहे व म्हणूनच हा विनोद स्वयंपूर्ण न होतां नाट्याला पोषक ठरला आहे. संवाद कसलेल्या लेखणीने लिहिलेले आहेत.


प्रयोग सुंदर होतो. मात्र दुसरा अंक अधिक संयमपूर्ण व्हावा असें वाटतें. श्रीधर व त्रिंबकराव यांचीं कामें बहारीचीं होतात व सर्व नट, नटी स्वतःच्या अभिनयाला प्राधान्य न देतां प्रयोगाला उठाव आणण्यासाठी आवश्यक व इष्ट अशी भूमिका करतात. दिग्दर्शनांतील कलात्मकता नेपथ्य, रंगभूषा इ. प्रत्येक गोष्टींत व्यक्त होते. 'नाटक चांगलें आहे त्यामुळे प्रयोग भिकार होऊनहि करमणूक झाली' अगर 'नाटक भिकार होतें, पण प्रयोग अप्रतिम होता' असे दोन तऱ्हेचे अभिप्राय बऱ्याच मराठी नाटकांवर दिले गेले आहेत, परंतु 'ससा आणि कासव' या नाटकांतील लेखकाचें सामर्थ्य आणि प्रयोगांतील दिग्दर्शन व अभिनयकौशल्य यांचा औचित्यपूर्ण मिलाफ रसिक श्रोत्यांचें अंतःकरण जिंकून घेतो.

★ ★



# रामनाथन् कृष्णन् आणि रॉय इमर्सन

## एक प्रेक्षणीय सामना



कृष्णन्-इमर्सन

विद्याधर

फेब्रुवारी २४ रोजीं पुण्यांतील क्रीडा डेक्कन जिमखाना कोर्टस्वर भारतीय क्र. १ रामनाथन् कृष्णन् व जागतिक क्र. १ रॉयइमर्सन यांच्यांत एक प्रेक्षणीय सामना झाला. दोघेहि पट्टीचे खेळाडू आहेत. गेल्या वर्षी ' विम्बल्डन स्पर्धेत रॉय इमर्सनचा कृष्णन्ने उपान्त्यपूर्व सामन्यांत सरळ तीन सेटमध्ये पराभव केला होता, परंतु त्यानंतर इमर्सनचा खेळ इतका सुधारला की, नंतरच्या सर्व सामन्यांत त्याने विजेतेपद मिळविलें आणि त्यामुळेच जागतिक गुणक्रमांकांत त्याला पहिला क्रमांक देण्यांत आला. भारतांत झालेल्या आशियाई स्पर्धेत व राष्ट्रीय विजेतेपदाच्या स्पर्धेत त्याने कृष्णन्ला ३-० व ३-१ असें हरविलें होतें. परंतु नंतर झालेल्या सर्व प्रदर्शनीय सामन्यांत कृष्णन्ने त्याला हरविलें होतें. त्यामुळे पुण्यांतील टेनीसप्रेमी लोकांनी या सामन्याला गर्दी करावी यांत नवल नव्हतें.

दुपारी बरोबर ३-२५ वाजतां सामन्याला सुरुवात झाली. तत्पूर्वीच्या २० मिनिटांत जिमखान्याचे सेक्रेटरी व समारंभाचे अध्यक्ष यांनी आपापलीं भाषणें आटोपलीं. हा कंटाळवाणा कार्यक्रम व त्याबद्दल प्रेक्षकांवर होणारी सक्ती ही सामन्यानंतर न करतां आधीच केल्याबद्दल जिमखान्याच्या चालकसमितीचें कौतुक करावेंसें वाटतें. याच वेळीं खेळाडूंना भेट व स्मृतिचिन्हें देण्यांत आलीं.

पहिल्या सेटच्या पहिल्या गेमपासूनच या दोघांनी आपला खेळ दाखवायला सुरुवात केली. टेनिसमध्ये साधारणपणें पहिली गेम पटकन् संपते. परंतु इमर्सनने ओळीने तीन पॉईंटस् घेतल्यावर कृष्णन्ने पण तीन पॉईटंस् घेऊन ' ड्यूस् ' केला. परंतु शेवटीं इमर्सनने तो सेट ६-३ ने घेतला.

दुसरा सेट पहिल्याच्या अगदी उलट होऊन तो कृष्णनने ६–२ ने घेतला. या सेटमध्ये कृष्णनने आपलें कौशल्य अगदी पणाला लावलेलें दिसलें. त्याने चेंडू अगदी अचूक जागीं टाकून पॉईटंस् घेण्याचें आपलें तंत्र उपयोगांत आणून इमर्सनला नामोहरम केलें.

परंतु इमर्सनने या सेटचें उट्टें पुढच्या सेटमध्ये काढलें. तो त्याने ६ विरुद्ध १ गेमने जिकला. त्याच्यापुढील कृष्णन्ने ६-४ ने व शेवटचा इमर्सन्ने ६-४ ने जिकून मॅच जिकली.

सबंध सामन्याकडे 'प्रदर्शनीय' (Exibition) सामना या दृष्टीने पाहिल्यास तो खरोखरीच प्रदर्शनीय झाला असें म्हणावें लागेल. या सामन्यांतून जरूर असणारी खिलाडू वृत्ति तर वारंवार दिसून येत होती. सेटमध्ये तर उघड उघड इमर्सन्ने तीन शॉटस् चुकीचे मारून तो सेट कृष्णनच्या पदरांत टाकला.

इमर्सन्ने मैदानांत उतरल्यापासूनच सर्वांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें होतें. जागतिक कीर्तीचा हा माणूस वयाने इतका तरुण पाहतांच प्रेक्षकांना फारच कौतुक वाटलें. कृष्णन्च्या आणि त्याच्या शरीरयष्टींत मात्र फार फरक होता. इमर्सन सडसडीत शरीरयष्टीचा व चपळ तर कृष्णन् जड शरीराचा व मंद वाटत होता. कृष्णन् नेटजवळ फारच सुंदर खेळ खेळतो अशी त्याची प्रसिद्धी आहे, परंतु


परंतु त्याने ती कसर ' स्पिन ' आणि ' पंच ' यांनी भरून काढली आहे. त्याची सर्व्हिस झाल्यानंतर चेंडूला फिरक येत असे व तो छाती-इतक्या उंचीची कुशी घेऊन उडत असल्यामुळे इमर्सन्‌ला जोरकस टोला मारणें कठीण जात होतें. याचबरोबर कृष्णन्‌चा अचूक अंदाज नजरेंत भरत होता. इमर्सन्‌ने कोठेहि चेंडू टोलविला तरी त्या भागांत कृष्णन् अगोदरच उभा असलेला दिसवयाचा.

इमर्सन व इतर ऑस्ट्रेलियन आणि अमेरिकन खेळाडू हे दमदार खेळ खेळणारे खेळाडू आहेत. टाऊलय कृष्णन् हा नाजूक खेळ खेळतो व त्यामुळेच तो जिंकतो. या सामन्यांतदेखील असेंच दिसून आलें. इमर्सनने मारलेले टोले, बेसलाईनपर्यंत जात, परंतु कृष्णन् आपले टोले कोर्टच्या मध्यावर व नेटजवळच टाकीत असे. त्यामळ इमर्सन्‌ला सबंध कोर्टभर पळावें लागे. दोघांच्याहि खळांतील वैशिष्टय म्हणजे त्यांचा आत्मविश्वास. त्यांनी मारलेले टोले नेटपासून चार इंचापेक्षा जास्त उंचीवरून कधी गले नाहीत किंवा त्यांचे " डाऊन दी लाईन ' शॉटस् साईडलाईनपासून एका इंचाबाहेर कधीहि गेले नाहीत.

या सबंध सामन्यांतील एक पॉईंट मात्र प्रेक्षक कधीहि विसरणार नाहीत. कृष्णन्‌ने नेटजवळ टाकलेला ड्रॉप घेण्याकरितां इमर्सन पुढे आला. कृष्णन्‌ने लगेच बेसलाईनवर लॉब (चेंडूला खूप उंची) टाकला तो घेण्याकरितां इमर्सन उलटा पळत गेला व बॅकहॅन्डने कोणत्याहि प्रकारची पूर्व सूचना न दर्शवितां कृष्णन्‌च्या उजव्या हातास शॉट मारून त्याने तो पॉईंट घेतला. सर्वसाधारणपणें खळाडू असा लॉब ड्रापशॉटने किंवा प्रतिलॉब टाकून परत करतात परंतु इमर्सनने तसें कांहीहि ना करतां नेटकडे पाठ असतांना शॉट व तोहि बॅकहॅन्डने मारून तो पॉईंट मिळविला. तेव्हा प्रेक्षकांच्या डोळयाचें पारणें फिटलें



रॉय इमर्सन



रामनाथन् कृष्णन्

या सामन्यांच्या वेळी मात्र असें दिसून आलें की, नेटजवळ टाकले ला चेंडू घेण्याकरितां पळत यायलामुद्धा कृष्णन्‌ला फारच त्रास पड त होता. इमर्सन्‌ने मारलेले पासिंगशॉटस् घ्यायलामुद्धा तो वाक त नव्हता किंवा पळत जायला तयार नव्हता. यामुळे त्याचे बरेचसे पॉइंटस् गेले.

दुसरी चटकन् नजरेंत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे इमर्सन्‌ची सर्व्हिस. इमर्सन्‌ची सर्व्हिस फारच जोरकस आहे. त्यामुळे कित्येक वेळा कृष्णन्‌ला ती परत पाठवितां नआल्याने इमर्सन्‌ने पॉइंटस् मिळवि परंतु जोरकस सर्व्हिसचा सगळयांत मोठा दोष-डबल फॉल्ट्-देखील इमर्सन्‌नेच केला. कृष्णन्‌चा फक्त १ डबल फॉल्ट आला, तर इमर्सनचे सहा झाले. कृष्णन्‌च्या सर्व्हिसमध्ये जोर नाही म्हणून ओरडा होतो

★ ★


## समाज प्रबोधन संस्था

### १२४२ सदाशिव पेठ पुणे २

| | | |
|---|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | | २·६० |
| राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता (संकलित निबंध) | | २·०० |
| भारतीय शेती : आर्थिक बाजू : स. ह. देशपांडे | | २-६० |
| वैज्ञानिक विचार-पद्धति : अ. भि. शहा | | |
| स्वतंत्र भारतांतील लोकशाही वाटचाल : चिकित्सक | | |
| व्यक्तिमत्त्वाची आधुनिक कल्पना : ग. वि. अकोलकर | | |

# पूर्ण विद्युत्प्रकाशित कोर्ट

## डेक्कन जिमखाना संस्थेची टनिस खेळाडूंसाठी नवी योजना



टेनिस सेक्रेटरी

डॉ. जी. ए. रानडे

महाराष्ट्रांतील सर्व क्लबांत डेक्कन जिमखान्याचें नांव प्रामुख्याने घेतलें जातें. प्रत्येक क्षेत्रांत या संस्थेने चांगले खेळाडू निर्माण केले आहेत. नाना जोशी, बाळ दाणी वगैरे सारखे राष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू येथूनच पुढे आले. रणजी ट्रॉफी सामन्यां तदेखील बरेचसे खेळाडू संस्थेने पाठविले आहेत. तरुण खेळांत हेमंत गोरेसारखे उदयोन्मुख खेळाडू आहेतच. टेबल टेनीस क्षेत्रांतदेखील संस्था मागे नाही. पपू हळदणकरसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू याच क्लबांतून खेळले. तसेंच यंदा आंतरविद्यापीठ सामन्यांत महिलांच्या टेबलटेनीस विभागांत अजिंक्यपद मिळविणाऱ्या कु. कुलकर्णी व कु. फुलंब्रीकर क्लबच्या सभासद आहेत आणि या सर्वाहून सरस म्हणजे अनेक वर्षे राष्ट्रीय विजेतेपद मिळविणाऱ्या श्रीमती मीना परांडे-देखील याच क्लबातून शिक्षण घेऊन पुढे आलेल्या आलेल्या आहेत.

आणि आता टेनीसक्षेत्रांतदेखील कांहींतरी नांव घेण्यासारखें करून दाखविण्याकरितां या क्लबचें चालक मंडळ व त्यांतल्या त्यांत अविश्रांत काम करणारे त्यांचे टेनिस सेक्रेटरी हे सारखे श्रम घेत आहेत. त्यांत अपेक्षित असें यशपण त्यांना लाभत आहे. कारण यंदाच्याच वर्षी ऑल इंडिया टेनिस असोसिएशनने क्लबच्या वार्षिक टेनिस स्पर्धांना राष्ट्रीय दर्जाचा मान दिला आहे. यंदा झालेल्या स्पर्धांत मुंबईच्या उदयकुमार ( भारत क्र. ३ ) व त्यांचे बंधु कीर्तिकुमार; तसेंच मद्रासचे बालसुब्रह्मण्यम् ( भारत क्र. ७ ) व मुंबईचे शामभिनोत्रा ( भारत ज्युनिअर क्र १ ) यांच्या सारख्या श्रेष्ठ खेळाडूंनी भाग घेतला होता. हे सामने पुण्यांतील टेनिसप्रेम वाढवायला नक्कीच कारणीभूत झालेले आहेत. नुकत्याच झालेल्या कृष्णन् इमर्सन् सामन्यामुळे भारतीय टेनिस असोसिएशनने त्यांच्यावरील आपला विश्वास दृढ झाल्याचें दाखवून दिलें आहे.

हा प्रदर्शनीय सामना संस्थेने कांही हेतु बाळगून येथे घडवून आणला. १२ जुलै ६१ च्या पुरानंतर खराब झालेलीं सर्व कोर्टस् पुन्हा नीट करून टेनीसला पुन्हा चालना दिली. तसेंच आणखी दोन नवीं कोर्टस् तयार करून त्यांनी एकूण नऊ कोर्टस् चालू केलेली आहेत. त्यावर त्यांचे दोनशे सभासद खेळतात. शाळकरी मुलांपासून जर या खेळाची गोडी निर्माण झाली तर त्यांच्यांतूनच पुढे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू निर्माण होण्याची शक्यता जास्त असल्यामुळे जिमखान्याने तसे शैक्षणिकवर्ग सुरु केले आहेत व दरवर्षी अशीं १६ मुलें स्वखर्चाने तयार करण्याची सध्यांची संस्थेची योजना आहे. या योजनेचा सुमारे २००० रु. खर्च जिमखान्याने स्वतःकडेच घेतला.

टेनिस सेक्रेटरी डॉ. रानडे यांची 'पूर्ण विद्युत् प्रकाशित' कोर्टची योजना ही त्यांच्या अविश्रांत व कल्पक मेहनतीची साक्षच आहे. सकाळीं उन्हामुळे किंवा ऑफिसच्या गर्दीमुळे व संध्याकाळी दिवसभराच्या दगदगीमुळे व लवकर पडणाऱ्या अंधारामुळे ज्यांना टेनिस खेळतां येत नाही, परंतु ज्यांना तें खेळण्याची फारच तीव्र इच्छा आहे अशांसाठी व इतर हौशी खेळाडूंसाठी असें महाराष्ट्रांतील एकमेव विद्युत् प्रकाशित कोर्ट बांधण्याची त्यांची इच्छा आहे. तसेंच खेळाडूंना सरावाकरिता एक सुव्यवस्थित व योग्य अशी 'प्रॅक्टिस वॉल' पण बांधावी अशी त्यांची कल्पना आहे. या योजनांसाठी संस्थेला सुमारे ११५०० रु. खर्च येणार आहे.

यापैकी आजीव सभासदत्वाचे ४००० रु. आठ लोकांनी देऊन संस्थेचा थोडा भार कमी केला आहे. उरलेले पैसे कृष्णन् इमर्सन्च्या सामन्यामुळे व नव्या कोर्टच्या जादा फीमुळे (सभासद व्हायला राजी आहेत,) मिळण्याची शक्यता आहे. तसेंच ११ मार्च रोजी झालेल्या 'एकपात्री सौभद्र' या सौ. सुहासिनी मुळगांवकर यांच्या नाट्यप्रयोगाचें उत्पन्नदेखील या योजनेकरितां खर्ची पडणार आहे.

या अभिनव प्रयोगांबद्दल व योजनांबद्दल डेक्कन जिमखान्याचे प्रेसिडेन्ट श्री. गोखले, चेअरमन डॉ. घारपुरे, टेनिस सेक्रेटरी, डॉ. रानडे व त्यांचे इतर सहकारी यांची पुणेकर जनता नेहमी ऋणी राहील व त्यांना त्यांच्या कार्यांत सुयश चिंतीत राहील. ★ ★

# नाट्यरत्न नानासाहेब चापेकर



*नागपूर येथे भरणाऱ्या मराठी*
*नाट्यपरिषदेच्या ४४ व्या संमेलनाचे*
*नियोजित अध्यक्ष*

( आमच्या प्रतिनिधीकडून )

नागपूर येथ भरणार असलेल्या ४४ व्या नाटचसंमेलनाच्या अध्यक्षपदीं जुन्या पिढींतील एक नामवंत नट श्री. ग. नी. उर्फ नानासाहेब चापेकर यांची निवड झाली आहे. हल्ली श्री. नानासाहेब हे रंगभूमीवर कामें करीत नसल्यामुळे आजच्या प्रेक्षकाला ते जरी अपरिचित असले तरी तीस चाळीस वर्षांपूर्वी त्यांनी केलेल्या एकापेक्षां एक यशस्वी स्त्रीभूमिका ज्यांनी बघितल्या असतील त्या जुन्या प्रेक्षकांना त्यांचें विस्मरण होणें अशक्य आहे. रंगभूमीच्या त्या ऐन वैभवाचे काळांत श्री. नानासाहेब चापेकर यांना बालगंधर्वांचे खालोखाल लोकप्रियता प्राप्त झाली होती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. अशा या रंगभूमीच्या सेवकाला हा बहुमान आज मिळत आहे हें सर्वदृष्टचा उचित व स्वागतार्हच आहे.

श्री. नानासाहेबांचें वय आज जवळ जवळ ६५ वर्षांचे आहे. गेल्या पिढींतील मराठीचे नामवंत प्राध्यापक व वक्ते कै. श्री. नी. चापेकर यांचे ते बंधु. ते स्वतःहि बी. ए. झालेले आहेत. शिक्षण चालू असल्यापासूनच नाटकें-विशेषतः बालगंधर्वांचीं नाटकें पाहण्याचा त्यांना विलक्षण नाद होता. तो बालगंधर्वांच्या ऐन वैभवाचा काळ होता. त्यांच्या अभिनयाची, गायनाची व सौंदर्याची श्री. नानासाहेबांवर इतकी मोहिनी पडली की, आपणहि रंगभूमीवर "असेंच कांहीं तरी भव्य करावें" अशी महत्वाकांक्षा त्यांच्या मनांत निर्माण झाली. पण शाळेंत विद्यार्जन करीत असतां त्यांनी रंगभूमीवर पदार्पण करण्याचें कटाक्षाने टाळलें. रंगभूमि गाजविलेल्या, पण काळ फिरल्यावर ज्यांना साधें पोट भरण्याचीसुद्धा पंचाईत पडावी अशा नटांचीं उदाहरणें पाहूनच त्यांनी हें टाळलें असावें. मात्र कॉलेजांत गेल्यावर रंगभूमीवर जाणें भागच पडलें आणि ते आज समतानंद या नांवाने प्रख्यात असलेल्या श्री. अ. ह. गद्रे यांच्यामुळे. श्री. अनंतराव गद्रे यांनी १९१८ मध्ये स्थापन केलेल्या हिंदी नाटक समाज या नाटचसंस्थेंत त्यांनी नानासाहेबांना पाचारण केलें. अर्थात्च अनंतरावांसारख्यांना नाराज करणें शक्य न झाल्यामुळे श्री. नानासाहेब हे नाटचसंस्थेंत सामील झाले व संस्थेच्या 'स्वराज्य सुंदरी' 'माझा देव' वगैरे नाटकांतून स्त्री–भूमिका त्यांनी केल्या.

याच नाटचसंस्थेच्या एका प्रयोगाला कै. केशवराव भोसले हे उपस्थित होते. रूपसुंदर चापेकरांना स्त्रीभूमिकेंत पहातांच असा देखणा नट आपल्या ललितकलेंत हवाच असें त्यांचें ठाम मत झालें. स्त्रीभूमिका करणाऱ्या अशा सुंदर नटाची त्या वेळीं ललितकलेजवळ वाणच होती. बाबूराव पेंढारकर हे स्त्रीपार्टी नट अभिनयसंपन्न असले तरी रूपसंपन्न नव्हते आणि केवळ या उणीवेमुळेच 'ललितकलादर्श' गंधर्वांशी बरोबर करूं शकत नव्हती. म्हणूनच वाटेल तें मोल देऊनहि श्री. चापेकरांना मिळविण्याची आज्ञाच त्यांनी आपल्या व्यवस्थापकांना केली.

## ललितकलेंत आगमन

'ललितकले'सारख्या उत्तम नाटचसंस्थेंत काम करण्याची आलेली ही संधि नानासाहेब थोडीच दवडणार? व्यवहाराच्या अटी व्यवस्थितपणें ठरवून नानासाहेब ललितकलेंत १९२१ सालीं प्रविष्ट झाले आणि येथून पुढे त्यांच्या वैभवाचा काळ सुरू झाला.

नवा नट नव्या नाटकांत लोकांपुढे इष्ट, हें केशवराव भोसल्यांना कुणी तरी सांगण्याची आवश्यकताच नव्हती. कै. अप्पा टिपणीस यांच्या "शहाशिवाजी" या नव्या नाटकांत त्यांनी नानासाहेबांचें प्रथम दर्शन 'ललितकले'च्या प्रेक्षकांना घडविलें. अर्थात् नायिका सईबाई हिचीच भूमिका नानासाहेबांना मिळाली होती. योग्य अभिनय, रूपसौंदर्य, गोड आवाज नि बालगंधर्वांच्या धाटणीचें गायन या सर्व गोष्टींमुळे नानासाहेबांची भूमिका प्रेक्षकांना फारच आवडली असल्यास नवल नाही. ललितकलेच्या मानापमान, मृच्छकटिक, विद्याहरण, मूकनायक या नाटकांतूनहि नानासाहेब नायिकेच्या भूमिका सफाईने करूं लागले. या त्यांच्या यशावर कळस चढला तो केशवराव भोसले आणि बालगंधर्व यांनी टिळकस्वराज्य फंडासाठी 'मानापमान' या नाटकाचा संयुक्त प्रयोग केला तेव्हा! या प्रयोगांत भामिनीची भूमिका अर्थातच बालगंधर्वांनी केली असली तरी अक्कासाहेबांची भूमिका नानासाहेबांकडेच आली. इतकी सुरेख जोडी रंगभूमीवर पुन्हा क्वचित्च पाहायला मिळाली असेल! या प्रयोगाचा दिवस हा नानासाहेबांना आपल्या आयुष्यांतील सर्वांत संस्मरणीय असा वाटत असल्यास नवल नाही.

पण या सर्वांगसुंदर प्रयोगानंतर थोड्याच दिवसांत दैवाची वक्रदृष्टि 'ललितकले'कडे वळली आणि केशवराव भोसले आजारी पडले. त्या आजारांतच ४ ऑक्टोबर १९२१

ोजीं त्यांना मृत्यु आला. या आघाताने नानासाहेब कांही काळ तरी दिङ्मूढ होऊन गेले, पण जातांना केशवराव भोसल्यांनी ललितकलेंची मालकी बापूराव पेंढारकर नि नानासाहेब या दोघांचे हातीं दिली. बापूराव पेंढारकरांचे बाबतीत ही गोष्ट अपेक्षितच होती, परंतु फक्त पांच सहा महिनेच कंपनींत असलेल्या नानासाहेबांकडे त्यांनी ही जबाबदारी द्यावी ही गोष्ट आश्चर्याची होती. अवघड जबाबदारीहि पेंढारकर–चापेकर यांनीं मोठ्या हिमतीनें अंगावर घेतली आणि मामा वरेरकरांचें 'सत्तेचे गुलाम' हें नवें नाटक मोठ्या थाटाने रंगभूमीवर आणलें. हें नाटक अत्यंत यशस्वी झालें. नानासाहेबांनी त्यांत केलेली नायिका 'नलिनी' हिची भूमिकाहि उत्कृष्ट ठरली. याच नाटकांत खलनायकाचें काम करण्यासाठी नानासाहेब चापेकरांनी नानासाहेब फाटक यांना 'ललितकलें'त आणलें.

'सत्तेचे गुलाम'चे यशानंतर 'ललितकलेंत' रंगभमीवर आणलेलें वरेरकरांचें 'तुरुंगाचे दारांत' हें नाटक मात्र साफ पडलें. या नाटकाचे आगेमागें ललितकलेने 'विद्याहरण' व 'शारदा' या जुन्या नाटकांचे प्रयोग केले. 'विद्याहरण' मध्ये नानासाहेबांनी प्रथमच कचाच्या पुरुष–भूमिकेंत रंगभूमीवर पदार्पण केलें. प्रथमच पुरुष–भूमिका असतांनासुद्धा ती त्यांनीं चांगलीच यशस्वी केली. याशिवाय इंदिराकाकू (शारदा) राधा (कुंजविहारी) वगैरे जुन्या नाटकांतील भूमिकाहि त्यांनी यथायोग्य केल्या.

१९२४ मध्ये पेंढारकर–चापेकर यांच्यामध्यें मतभेद होऊं लागले आणि त्याचें पर्यवसान १ सप्टेंबर १९२४ रोजीं नानासाहेबांनी 'ललितकला' सोडण्यांत झालें.

### अनेक कंपन्या, अनेक कामें

'ललितकलें'तून बाहेर पडल्यावर त्या वेळीं बंद पडलेली किर्लोस्कर नाटक मंडळी नानासाहेबांनी चालवावयास घेतली. या मंडळीला कोल्हापूरचा राजाश्रयहि मिळाला. या मंडळीमार्फत 'राजरंजन' हें कै. अप्पा टिपणीस यांचें नाटक नानासाहेबांनी रंगभूमीवर आणलें. पण तें पुरेसें यशस्वी झालें नाही. त्यानंतर 'किर्लोस्कर' ने ३-४ वर्षे जुन्याच नाटकांचे प्रयोग केले. आर्थिक मंदी व नव्या नाटकांचा अभाव या कारणांमुळे नानासाहेबांना १९१९ मध्ये 'किर्लोस्कर' कंपनी बंद करावी लागली.

**बालगंधर्व ? छे: नानासाहेब……..**



किर्लोस्कर बंद पडल्यानंतर नानासाहेबांनी मुंबईस कांही मूकपटांत भूमिका केल्या १९३१ मध्ये अनंतराव गद्रे यांनी सुरू केलेल्या 'मुंबई नाटिका' या संस्थेसाठी त्यांनीं नानासाहेबांना पुन्हा बोलावून घेतलें. या संस्थेची 'कुमारी १९३१' ही नाटिका सर्वच दृष्टींनी मुंबईत यशस्वी ठरली. नानासाहेबांची त्या नाटिकेंतील भूमिकाहि उत्कृष्ट होत असे. तथापि ही संस्था फक्त नाटिकाच करीत राहिल्यामुळे मोठीं नाटकें पहाण्याची संवय झालेल्या बाहेरगांवच्या प्रेक्षकांनी तिला अपेक्षित आश्रय दिला नाही.

यानंतर नानासाहेबांनी तीहि संस्था सोडली व १९३४ पर्यंत 'नूतन नाटिका समाज', 'बालमोहन संडळी' वगैरे नाटक मंडळ्यांतून भूमिका केल्या. मात्र या संस्थांतील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या नाहीत.

१९३४ मध्ये नाटकधंद्याला तात्पुरता रामराम ठोकून त्यांनी 'निर्भीड' साप्ताहिकामध्ये नोकरी पत्करली. अर्थात् रंगभूमि गाजवलेल्या त्यांच्यासारख्याला या नोकरींत विशेष स्वारस्य वाटणें शक्यच नव्हतें. वर्षभर ती नोकरी त्यांनी कशीतरी केली आणि बाबूराव पटेल यांनी आपल्या बोलपटांत काम करण्यासाठीं बोलवतांच ते 'निर्भीड'-मधून बाहेर पडले.

### 'नाट्यरत्न नानासाहेब'

बाबुराव पटेलांच्या 'महाराणी' या बोलपटांत 'राजगुरु' ही महत्त्वाची भूमिका व त्या बोलपटाचें संगीत दिग्दर्शन हीं महत्त्वाचीं कामें नानासाहेबांनी केली. ती नोकरी सोडल्यावर नानासाहेब फाटक यांच्या जोडीनें 'संयुक्त नटसंघ' हें नांव घेऊन त्यांनी पुण्यप्रभावचे बरेच प्रयोग केले. त्यांची वसुंधरेची भूमिका रसिकांना फारच आवडली. इतकी की, त्या भूमिकेची बालगंधर्वांशीं तुलना केली गेली. या भूमिकेबद्दल त्यांना अनेक सुवर्णपदकें, शालू, मानपत्र वगैरेंचा लाभ झाला. इतकेंच नव्हे तर कोल्हापूरच्या क्षात्रजगद्गुरूंनी त्यांना 'नाट्यरत्न' ही पदवी दिली.

परंतु अंतर्गत मतभेदांमुळे हा संयुक्त नटसंघ मोडला. १९४० मध्ये बालगंधर्वांच्या आमंत्रणावरून नानासाहेब गंधर्व नाटक मंडळींत गेले. तेथील भूमिकाहि त्यांनी चांगल्या केल्या पण पूर्वीचें वातावरण गंधर्व नाटक मंडळींत त्या काळी नसल्यामुळे चार पांच महिन्यांतच नानासाहेब गंधर्व मंडळींतून निघाले.

रंगभूमीवर कामें करून उदरनिर्वाह होणें अशक्य होऊं लागल्यामुळे नानासाहेबांनी नभोवाणीवर नोकरी पत्करली.

आजवरचा एवढा प्रदीर्घ अनुभव पाठिशी असल्याने नानासाहेब आपल्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दींत नाट्याची कांही भरीव सेवा करतील असा त्यांच्या विषयी विश्वास वाटतो. अधिकाराच्या अल्प काळांत अनेक गोष्टी साधण्याचा त्यांचा विचार आहे. मुख्यतः नाट्यपरिषदेचें कार्य याहूनहि विस्तृत करावें अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. आज फारच थोड्या लोकांना हें परिषदेचें नांव व तिचें कार्य माहीत आहे. तें सर्वांपर्यंत पोहचवून तिला लोकाश्रय मिळविण्याचा त्यांचा मानस आहे.

नानासाहेब मूळचे पुण्याचे. तेव्हा त्यांना पुण्याबद्दल प्रेम असणें सहाजिकच आहे पुण्यांत कायम स्वरूपाचें एकहि थिएटर नाही ज्या पुण्यांत नाट्यकला जगली तेथे थिएटर नसावें ही गोष्ट त्यांना फारच खेदकारक वाटते. पुण्यांत थिएटर व्हावें यासाठी जेवढें म्हणून करतां येण्यासारखें आहे तेवढें करण्याची त्यांची तयारी आहे. तें झालें तर

कोणीहि पुणेकर नाट्यप्रेमी माणूस या प्रयत्नासाठी त्यांना धन्यवादच देईल.

महाराष्ट्र राज्य सरकार प्रतिवर्षी ज्या नाट्यस्पर्धा भरवितें त्यामध्ये बऱ्याच सुधारणा हव्या आहेत अशी त्यांची कल्पना आहे. स्पर्धेच्या बाबतींत विशिष्ट प्रांतांचा अभिमान अगोदरपासून निर्माण केला जातो, तो त्यांच्या मतें योग्य नाही. त्या दृष्टीनें बक्षिसें दिलीं जातात हेंहि गैर आहे. तसेच स्पर्धेसाठी अनेक नाटकें करण्याऐवजी एकच नाटक सर्व संस्थांनी करावे, म्हणजे खरी कसोटी लागेल असेंहि त्यांना वाटतें. आज भिन्न भिन्न नाटकें येतात, त्यांत एकादी व्यक्तिरेखा खरोखरच प्रभावी असते आणि ती निटाला पारितोषिक मिळवून देते. पण त्यामुळे वस्तुतः परीक्षकाची व नटाची दिशाभूल होते. त्यांत निम्मे यश लेखकाचें असतें हें विसरून चालणार नाही! एकच नाटक नेमलें असतां सर्वांना सारखा न्याय मिळून खऱ्या नटाची पारख होईल, कलेच्या कामांत तडजोड ही मुळीच उपयोगी नाही. तेथें खऱ्या गुणांचीच जरूरी असते.



'शहाशिवाजी' मध्ये
गणपतराव देवासकर ( शिवाजी ) आणि
नानासाहेब चापेकर ( सईबाई )

यावरूनच नानासाहेब जुन्या पठडीत मुरलेले असले तरी नव्या गोष्टींचा त्यांना राग नाही, नवे – जुने यांचा समन्वय रंगभूमीवर झाला पाहिजे हीच त्यांची इच्छा आहे.

● ●


र.नं. ३१०३६ — विना सहकार नहि उद्धार — र. ता. २१-२-१९६१

सभासदांना पीक तारणावर कर्ज देणें, शेतकऱ्याला खतें, पेण्ड व सल्फेट पुरविणें, शेतीसाठी उपयुक्त अवजारें भाड्यानें देणारी प्रगतीशील......

**भगवतीपूर विविध कार्यकारी सेवा सहकारी**

**सोसायटी लि. मु. भगवतीपूर,**

**पो. कोल्हार ( बु. ) ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर.**

● सभासद संख्या २६० ● शेअर भांडवल २,०६,९७० ● इतर संस्थेत गुंतविलेलें भांडवल ३,१५० ● खेळतें भांडवल ८,२०,३६० ● सभासदांच्या उंसाचें क्षेत्र ७२५ एकर ● सोसायटीच्या १८५ सभासदांनी 'प्रवरा नगर सहकारी साखर कारखान्याचे' शेअर्स घेतले आहेत ●

**संचालक मंडळ**

श्री. रावसाहेब भाऊराव खर्डे ( पाटील ) ( चीफ प्रमोटर )
श्री. दशरथ बाबुराव खर्डे ( पाटील ) ( चेअरमन )
श्री. यादवराव विठूजी खर्डे ( पाटील ) ( व्हा. चेअरमन )

– अॅ. सेक्रेटरी –
श्री. निवृत्ती शंकर खर्डे
श्री. रामचन्द्र विष्णु धायगुडे

– सेक्रेटरी –
श्री. सदाशिव महादेव पुजारी

● **इंजिन्सला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या तेलांचे प्रमुख विक्रेते** ●



# बुद्धिबळाच्या पटावर

श्रीकृष्ण साखळकर

(लेखांक– सातवा)

**पटाचा मध्य (पुढे चालू)**

आपलीं मोहोरीं पटाच्या मध्याच्या रोखाने खेळावयाचीं व प्रतिपक्षाचीं मोहोरीं पटाच्या मध्यावरून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करावयाचा हा डावाच्या सुरुवातीला प्रत्येक खेळाडूचा उद्देश असला पाहिजे हें आपण मागील अंकीं पाहिलें. त्या वेळीं मीं नमूद केलें होतें की, प्रतिपक्षाचीं मोहोरीं उधळून लावण्यासाठी प्याद्याचा उपयोग करावयाचा. हा उपयोग कसा करावयाचा ते आपण पाहूं.

प्रथमतः एक गोष्ट जरूर लक्षांत ठेवावयाला हवी की, प्याद्याच्या खेळचा या बऱ्याच वेळा मोहोऱ्यांची गति प्रमाणित करतात व म्हणून फक्त प्यादीं जरूर तेवढींच खेळणें योग्य होय. जर का प्याद्याशिवाय इतर मोहोरीं आपल्याला डावाच्या सुरुवातीला खेळतां आलीं असतीं तर फार चांगलें झालें असतें. पण तें शक्य होत नाही, कारण प्रतिपक्ष मग पटाच्या मध्यावर प्यादीं खेळून आपला डाव उधळूं शकतो. तें कसें तें पहा.

१) घो–राव ३, घो–वउं–३; २) प्या–रा ३, (हें प्यादें एकच घर खेळलें असल्या कारणाने तें खेळलेंच नाही असें म्हटलें तरी चालेल) २)...प्या–रा ४; ३) घो–वउं ३, घो–राव ३; ४) उं–उं ४; १ प्या–व४; ५) उ –घो ३ (उं २ पळवला) ५).... प्या–व ५ आणि पांढऱ्याचीं मोहोरीं अडचणींत आलीं आहेत.

तात्पर्य प्याद्याच्या खेळचा पटाचा मध्य लक्षांत घेऊन खेळल्या तरच त्या डावाच्या सुरुवातीला उपयुक्त असतात. यावरून हें सहज लक्षांत येईल की, हत्तीचीं व घोड्याचीं प्यादीं, ज्यांचा पटाच्या मध्याशीं फ़ार दूरचा संबंध आहे तीं खेळण्यांत डावाच्या सुरुवातीला कांहीच फायदा नाही. वजीर, राजा, व उंटांचीं प्यादीं जरूर तेवढीं खेळून आपलीं मोहोरीं डावांत आणण्याची कुशलता खेळाडूने डावाच्या सुरुवातीला दाखविणें जरूर आहे.

बंद डावांत ज्या ठिकाणीं पटावर हालचाली धिम्या होत असतात त्या ठिकाणीं प्याद्याच्या अगांतुक खेळचा एक वेळ क्षम्य ठरतात. पण उघड्या डावांत, ज्या ठिकाणीं डाव गतिमान असतो तेथे प्याद्याच्या निष्कारण खेळचा खेळल्यास पश्चात्ताप करावयाची पाळी येते.


पटाच्या मध्यावर आपण प्यादीं खेळणार तशीं आपला प्रतिपक्ष पण खेळणार. मग प्याद्याच्या मारामारीचा प्रश्न येणार ! त्याला दोन पर्याय आहेत. १) प्याद्याला प्यादें मारून टाकावयाचें २) किंवा आपल्या प्याद्याला दुसऱ्या प्याद्याचा जोर करून पटाच्या मध्यावर आपलें प्यादें स्थिर राखावयाचें.

जर आपण प्रतिपक्षाच्या पुढे जलद मोहोरीं खेळूं शकत असलों तर प्यादा–प्यादी करणें फ़ायद्याचें होतें. जसें: –१) प्या–व ४, प्या–व ४; २) प्या–वउं ४, घो–राव ३; ३) प्या ×प्या आणि आता काळा ३).... व×प्या खेळला तर ४) घो–वउं ३ खेळावयाचा आणि वजीराला पळवावयाचें व जर काळा ३)... घो×प्या खेळला तर ४) प्या–रा ४ खेळून घोडा पळवावयाचा व आपलें दुसरें प्यादें पटाच्या मध्यावर आणावयाचें.

यावरून हें लक्षांत यईल की, कनिष्ठ मोहोऱ्याने वरिष्ठ मोहोऱ्यावर हल्ला केला की, वरिष्ठ मोहोऱ्याला पळतां भुई थोडी होते व तो मोहोरा पळवतांना खेळचा फुकट जातात. कारण मग इतर मोहोरीं खेळावयास वाव मिळत नाही. म्हणून डावाच्या सुरुवातीला दोन महत्त्वाचे मुद्दे लक्षांत ठेवावयाला हवेत १) प्रत्येक मोहोरा कमीत कमी खेळचांत डावांत आणायला हवा २) भारी मोहोरीं डावाच्या सुरुवातीला भर डावांत घुसवण्यांत फायदा नाही, कारण त्यांना हल्ल्याचा प्रतिकार करणें जड जातें. तेव्हा घोडे व उंटच डावाच्या सुरुवातीला जलद डावांत आणणें योग्य होय. वजीर व हत्ती जर दुरूनच प्रभाव पाडतील तर श्रेयस्कर. राजा तर जितक्या लवकर दुर्गाश्रयाला जाईल तेवढा चांगला. कारण राजा धोक्यांत आल्यावर इतर सर्व गोष्टी बाजूला सारून त्याचीच काळजी घेण्यांत वेळ जातो व प्रतिपक्षाचें फावतें.

ज्या वेळीं प्यादा–प्यादी करून कांहीच फायदा होणार नसतो त्या वेळीं प्याद्याला दुसऱ्या प्याद्याचा जोर करून पटाच्या मध्यावर आपलें प्यादें टिकवून धरण्यांत शहाणपणा आहे.

● ●




जयाजीं आबाजीं वाघ
मेहुणबारा

# फाउंडेशनची मांडणी

लेखांक–चौथा


**फाउंडेशनची मांडणीः–**

वरीलप्रमाणे सर्व तयारी झाल्यानंतर खड्ड्याचा पाया भरून घ्या. पाया दगड विटांनी सिमेंटमध्ये साधारणतः ५-६ इंच भरावा. पाया भरल्यानंतर फाउंडेशन खड्ड्यावर चौकट फाउंडेशनबोल्ट, खोका यांची मांडणी करावयाचें महत्त्वाचें काम करावें लागतें. अगोदर खड्ड्यावर खोक्यास आधार म्हणून दोन पहारी, ठेवा. पहारीवर खोका अशा रीतीने ठेवा की, खोक्याच्या चारहि बाजू खड्ड्याच्या बाजूपासून सारख्या अंतरावर येतील. त्यानंतर खोक्यावर दोन गज आडवे ठेवा. त्यावर चौकट ठेवा. चौकटीच्या बाजूं खोक्याच्या बाजूपासून सारख्या अंतरावर येतील (आकृति १ व २ पहा) नंतर चौकटीस असलेल्या छिद्रांत बोल्ट घाला. बोल्टमध्ये




खड्डयाचा पाया

योग्य मापाने कापलेल्या बांबूच्या नळ्या अडकवा. त्यावर वॉशर घालून नट लावा. अशा रीतीने चारहि बोल्ट अडकवा व फाउंडेशन बोल्ट खड्ड्याच्या बाजूपासून सारख्या अंतरावर आहेत का हें पहा. चौकट बरोबर लेव्हलमध्ये आहे किंवा नाही हें पहा. चौकट लेव्हल मध्ये आणण्यासाठी पहारीखाली कांही आधार द्या. खालची जागा बरोबर करा व चौकट आडवी उभी बरोबर लेव्हलमध्ये येईल असें करा. एंजिनच्या फाउंडेशन बोल्टांतील उभें आडवें व तिरकस अंतर मोजून तें आपण मांडणी केलेल्या फाउंडेशन बोल्टच्या गजाशीं अजमावून पाहा.




**मिश्रण पद्धतिः–**

मिश्रण करण्याचे अगोदर वाळू व खडी पाण्याने धुऊन टाकणें आवश्यक आहे. कारण वाळूंत मातीचें मिश्रण असतेंच आणि सिमेंट मातीचें नातें सवतीचें आहें. सिमेंटमध्ये माती कालविली गेल्यास सिमेंट मेळ धरत नाही व आपले फाऊंडेशन निरूपयोगी होतें. यासाठी निदना

वाळू तरी आवश्य धुवून घ्यावी. मिश्रण करण्यासाठी वाळू, सिमेंट व खडी यांचें सारख्या प्रमाणांत मिश्रण होणें जरुरीचें आहे. नाहीतर काही ठिकाणी वाळू जास्त होईल तर कांही ठिकाणी सिमेंट कमी होईल असें होऊं नये. मिश्रणाचें प्रमाण सारखें रहावें म्हणून खालील पद्धत उपयोगांत आणली तर फार चांगलें होईल. मिश्रण करण्यासाठी खाली लोखंडी पत्रा अगर विहिरीचें थाळणें उपयोगांत आणावें त्यामुळे खालील माती मिश्रणांत जाणार नाही. पत्र्यावर अगर थाळण्यांत चार तगाऱ्या खडी सारखी पसरावी नंतर त्यावर दोन तगाऱ्या वाळू पसरावी व वाळूवर एक तगारी सिमेंट सारखें पसरावें. सिमेंटवर परत चार तगाऱ्या खडी, खडीवर दोन तगाऱ्या वाळू व वाळूवर एक तगारी सिमेंट अशा पद्धतीने खडीवर वाळू वाळूवर सिमेंट असे थर द्यावेत नंतर एकाने पाण्याची झारी घेऊन त्यावर झारीने पाणी टाकावें दुसऱ्याने पावडीने तें मिश्रण चाळावें एकीकडून चाळून झाल्यावर परत दुसरीकडून चाळून घ्यावें. अशा रीतीनें ३-४ वेळा झाल्यावर आपलें मिश्रण वापरण्यास योग्य झाले असे समजावें. आकृति नं. ४ पहा.




**प्रत्यक्ष फाउंडेशन:--**

योग्य मिश्रण झाल्यावर आपली मांडणी बरोबर असल्याची पुन्हा एकवार खात्री करा. तसें नसल्यास योग्य दुरुस्ती करा. आपण मिश्रण करावयाच्या कामात असतांना कोणी नजरचुकीने धक्का लावल्यामुळे अगर आपल्या चुकीमुळे मांडणी चुकण्याचा संभव असतो. मांडणी बरोबर असल्याची खात्री झाल्यावर मिश्रण ओतायला सुरुवात करा. मिश्रण सगळीकडे सारखें ओता व ओतत असतांना करणीने सगळीकडे सारखे पसरावा ८-९ इंचांचा थर झाल्यावर ठोक्याने ठोकून घ्या. गजाच्या आजूबाजूला पोकळ राहाणार नाही अशी काळजी घ्या. मिश्रण ओततांना खंड पडणार नाहि अगर मांडणी बिघडणार नाही अशी काळजी घ्या. जमिनीच्या पातळीवर मिश्रणाने खड्डा भरुन आल्यानंतर खोक्याला दिलेला आधार काढून घ्या. कारण खोक्यांत आता मिश्रणाचा आधार झालेला असतो. उरलेल्या मिश्रणात आणखी अर्धी तगारी सिमेंट कालवा. खोक्याचा आधार काढल्यावर परत आणखी मांडणी तपासांत चौकट लेव्हलमध्ये आणा व नंतर खोक्यावरील पद्धतीने मिश्रण ओता. हें सुद्धा पोकळ रहाणार नाही अशी काळजी घ्या. मिश्रण खोक्याच्या वरच्या भागापर्यंत आल्यावर चौकटीला दिलेला आधार काढून घ्या. चौकटीखाली थोडी फार पोकळी असल्यास करणीने पोकळींत मिश्रण लोटा. नंतर लेव्हल–बाटलीच्या सहाय्याने चौकट उभी आडवी लेव्हलमध्ये आहे किंवा नाही तें पहा. तसें नसल्यास योग्य तेथे ठोकून अगर चौकटीच्या खाली मिश्रण लोटून चौकट लेव्हलमध्ये आणा. चौकट बरोबर लेव्हलमध्यें आल्यावर आपलें फाउंडेशन झालें असें समजावें.

**फाउंडेशन नंतर:–**

फाऊंडेशन झाल्यावर त्यावर ओला बारदान टाका. फाउंडशन शक्यतों उन्हांत रहाणार नाही अशी व्यवस्था करा. २-४ तासानंतर त्यावर पाणी टाका. परत २-३ तासांनी पाणी टाका. फाउंडेशन झाल्यावर १०-१२ तासांनी खोका अलगत काढून घ्या. खोका काढतांना फाउंडेशनच्या कोणत्याहि भागास धक्का लागणार नाही अशी काळजी घ्या. नंतर अर्धी तगारी बारीक अगदी बारीक वाळू घ्या. त्यांत पावपट सिमेंट कालवा. बारीक वाळू व सिमेंटच्या मिश्रणाने भिंतीवर जसा गिलावा करतात. तसा फाउंडेशनला पातळ गिलावा करा. गिलावा झाल्यावर त्यावर ओला बारदाना टाका. प्रत्येक ४-५ तासांनी त्यावर पाणी टाका. बारदाना सुकणार नाही व फाउंडेशन नेहमी ओलें राहील अशी काळजी घ्या. जवळ जवळ २० दिवस काळजी घ्या. इतकी काळजी घेतल्यानंतर एंजिन बसवायला योग्य असें फाउंडेशन झालें असें समजायला कांही हरकत नाही.

भारतीय महिलांना हातमागाचें वस्त्र शोभून दिसतें.
आपल्या पसंतीसाठी आमची.....

★ गोवर्धन साडी ★

सदैव वापरा

सोसायटीच्या खास देखरेखीखाली उत्पादन केलेली
हातमागाची ९, ६ व ५ वारी फॅन्सी पातळें

उत्पादक :–

गोवर्धन हातमाग वस्त्र उत्पादक
सहकारी सोसायटी लि.
नेहरू चौक, अहमदनगर



# ३७१/२ टक्के सवलतीची अपूर्व योजना

केवळ साहित्य, केवळ ललितकला, केवळ करमणूक हा आजच्या मासिकसृष्टीचा एकतर्फी
सांचा सोडून जीवनाच्या सर्वांगिण विकासाची दृष्टि देणारा,

राजकारण, समाजकारण, संस्कृति, साहित्य, शिक्षण, उद्योगधंदे, शेती, क्रीडा, रंगभूमि,
चित्रपट इत्यादि समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करणारा,

विधायक वृत्तीचा, जबाबदार जाणिवेचा

# माणूस

*जून १९६२ पासून दुसऱ्या वर्षांत पदार्पण करीत आहे.*

★

वाचकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी

## जूनपासून अंकाच्या पृष्ठसंख्येंत वाढ करावी लागत आहे.

**जूनपासून वार्षिक वर्गणी आठ रुपये; किरकोळ अंक एक रुपया. मे १९६२ अखेर वर्गणीदार होणाऱ्यांस केवळ पांच रुपये वार्षिक वर्गणींत दिवाळीअंकासह सर्व अंक घरपोंच मिळतील.**

*आजच पांच रुपये म. ऑ. ने पाठवून सवलतीचा लाभ घ्या.*


संपादक–मुद्रक–प्रकाशक : श्री. ग. माजगावकर : प्रकाशन स्थळ–राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव, पुणें २
मुद्रणस्थळ–साधना प्रेस, ४३०–३१ शनवार पेठ, पुणें २